cmyk

## संपादकीय

### सरकारची रोज कोंडी !

महायुती सरकारकडे स्पष्ट बहुमत आहे, मात्र सरकारमधील तीन पक्षांमध्ये आलबेल नसल्याने विशेषत: मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यात असलेल्या सुप्त संघर्षात सरकारची रोज कोंडी होताना दिसत आहे. एकनाथ शिंदे यांना पुन्हा राज्याचे मुख्यमंत्री व्हायचे आहे, मात्र भाजपकडून त्यांना प्रतिसाद मिळत नाही. शिंदे यांना मुख्यमंत्री करण्याचे आश्वासन दिल्याचे काही शिवसेनेचे नेते सांगतात, मात्र शिंदेंनी तसे अजुन जाहीरपणे सांगितलेले नाही. त्यामुळे शिंदे गटातील मंत्री आणि आमदार हे सातत्याने सरकार विरोधी कारवाया करत असल्याचे देखील बोलले जात आहे.


# दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com


### बबन शिंदेच्या बोगस शाळेवर अनुदानाची खैरात!

बीड बीड जिल्हा परिषदेच्या अधिकाऱ्यांचा कारभार कसा अंदा धुंद आहे याचे एक अनोखे उदाहरण समोर आले आहे. दोन वर्षापासून वादाच्या भोवऱ्यात सापडलेल्या जिजाऊ पतसंस्थेचे मालक बबन शिंदे यांच्या मूकबधिर शाळेचा यु-डायस नंबर आणि इतर कागदपत्रे तसेच विद्यार्थी संख्या पुरेशी नसताना देखील समाज कल्याण अधिकाऱ्यांनी त्यांच्यावर अनुदानाची खैरात केली आहे हा प्रकार म्हणजे आंधळं दळतय आणि कुत्र पीठ खातय असाच म्हणावा लागेल. ही शाळा कायमस्वरूपी बंद करून या शाळेतील विद्यार्थ्यांचे इतरत्र स्थलांतर करून समाज कल्याण अधिकाऱ्यांवर कारवाई करावी अशी शिफारस समाज कल्याणचे संभाजीनगर विभागाचे उपायुक्त यांनी केली आहे.

बीड - महाराष्ट्र वर्ष-५ अंक-११२ रविवार, दि.१७ ऑगस्ट २०२५ RNI No.: MAHMAR/2021/85884 NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 पाने-६ किंमत ३ रूपये

## थोडक्यात...

### किश्तवाड ढगफुटीत मृतांचा आकडा ६५ वर

जम्मू : जम्मू आणि काश्मीरमधील किश्तवाड येथील चशोटी गावात गुरुवारी झालेल्या ढगफुटीने आतापर्यंत ६५ जणांचे मृतदेह बाहेर काढण्यात आले आहेत. अद्यापही अनेक लोक पाण्यात आणि डोंगराच्या ढिगा-यात अडकले आहेत. २१ मृतदेहांची ओळख पटली असून १६७ जणांना वाचवण्यात यश आले आहे. त्यापैकी ३८ जणांची प्रकृती गंभीर आहे. मुख्यमंत्री अब्दुल्ला म्हणाले की, १०० हून अधिक लोक अजूनही बेपत्ता आहेत.

### खडसेंच्या जावयाचा पाय खोलात

पुणे : खराडी पार्टी प्रकरणात राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार) नेते एकनाथ खडसे यांचे जावई डॉ. प्रांजल खेवलकर यांच्याविरुद्ध सायबर पोलीस ठाण्यात शुक्रवारी गुहा दाखल करण्यात आला. एका महिलेचे विवस्त्र अवस्थेतील फोटो काढल्याप्रकरणात तिने दिलेल्या तक्रारीवरून हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सायबर पोलिसांनी या प्रकरणी भारतीय न्याय संहिता ७७, तसेच माहिती-तंत्रज्ञान कायदा २००० कलम ६६ (ई) अन्वये डॉ. खेवलकर यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला. खराडीतील एका हॉटेलमध्ये २५ जुलै रोजी झालेल्या पार्टीवर गुन्हे शाखेने छापा टाकला.

### कोल्हापूर सर्किट बेंचचे आज उद्घाटन

कोल्हापूर : सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश भूषण गवई यांच्या हस्ते रविवारी १७ ऑगस्ट दुपारी ३.०० वाजता कोल्हापूर सर्किट बेंचचे उद्घाटन होणार आहे. या कार्यक्रमासाठी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार यांच्यासह मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती अलोक अराधे, सार्वजनिक आरोग्य मंत्री व कोल्हापूरचे पालकमंत्री प्रकाश आबिटकर, वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ तसेच न्यायमूर्ती मकरंद कर्णिक यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित राहणार आहेत. या ऐतिहासिक क्षणाचे साक्षीदार होण्यासाठी करवीर नगरी सज्ज झाली आहे. गेल्या ४२ वर्षांच्या लढ्यानंतर अखेर कोल्हापूरसह सहा जिल्ह्यांसाठी सर्किट बेंचचे स्वप्न सत्यात उतरत आहे.

### मुंबईत एका गोविंदाचा मृत्यू, अनेक जखमी

मुंबई : मुंबईतील मानखुर्द येथे एका गोविंदाचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना घडली. त्यामुळे, दहीहंडी उत्सवाला गालबोट लागले असून दहीहंडीचा रोप बांधताना हा अपघात झाल्याची माहिती आहे. दुसरीकडे मुंबईत दहीहंडी उत्सवाचा मोठा जल्लोष पाहायला मिळत असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांसह अनेक राजकीय नेते दहीहंडी उत्सवात सहभागी झाल्याचे दिसून आले. दुसरीकडे अभिनेते, सेलिब्रिटीही आणि नृत्यांगणा गौतमी पाटीलचाही जलवा पाहायला मिळला. मानखुर्दमध्ये एका गोविंदाचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली असून बाल गोविंदा पथकातील ३२ वर्षीय गोविंदाला जीव गमवावा लागल्याने सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.

# राज्यभरात धो धो...! शेतीपिकाचे नुकसान

## सतर्कतेचा इशारा : विदर्भ मराठवाड्यासह कोकणात अतिवृष्टी

पुणे । प्रतिनिधी

माध्यंतरी गायब झालेल्या पावसाने ऑगस्टच्या पहिल्या आठवड्यापासूनच आता जोरदार पुनरागम केले असून राज्यभरात धों धों पाऊस कोसळताना दिसत आहे. विशेष करून मराठवाड्यात मागील दोन दिवसांपासून मुसळधार पावसामुळे बीड, धाराशिव, लातूर, परभणी, नांदेड आणि छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात शेती पिकांना मोठा फटका बसला आहे. तर उर्वरित राज्यात हलक्या ते मध्यम पावसाच्या सरीने हजेरी लावली आहे. त्यामुळे शेती पीक, घरांसह जनावरांचे नुकसान झालें आहे.

कोकणात सलग चार दिवसांपासून मुसळधार पाऊस सुरू आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कुडाळ आणि वैभववाडीला मुसळधार पावसाने पान २ वर



### मांजरा प्रकल्प भरला ; ४ दरवाजे उघडले !

मराठवाड्यात गेल्या दोन दिवसांपासून सुरू असणाऱ्या मुसळधार पावसाने बीड, धाराशिव लातूर जिल्ह्यात बऱ्याच भागांना तडाखा बसला आहे. लातूर-धाराशिव आणि बीड जिल्ह्यांच्या सीमारेषेवर असलेले मांजरा धरण भरले असून, त्यातून पाण्याचा विसर्ग सुरू करण्यात आला आहे. लातूर शहराला पाणीपुरवठा करणारे हे मुख्य धरण ९०% पेक्षा अधिक भरल्यामुळे प्रशासनाने चार दरवाजे उघडण्याचा निर्णय घेतला आहे. मांजरा धरणातील ४ वक्रद्वारे प्रत्येकी ०.२५ मीटर उंचीने उघडून ३४९४.२८ क्यूसेक्स (९८.९६ क्यूमेक्स) इतका विसर्ग मांजरा नदीपात्रात सोडण्यात आला आहे. पुढील पावसाच्या स्थितीनुसार विसर्गात बदल करण्यात येईल, अशी माहिती प्रशासनाने दिली आहे. दरम्यान, नदीकाठावरील तसेच पुरामुळे बाधित होऊ शकणाऱ्या गावांतील नागरिकांनी सतर्क राहण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे. कोणीही नदीपात्रात उतरणार नाही. जीवित अथवा वित्तहानी होणार नाही याची खबरदारी घ्यावी. अशा सूचना करण्यात आल्या आहेत. बीड, लातूर, धाराशिव आणि कर्नाटकातील बिदर जिल्ह्यातील प्रशासनाला सतर्कतेच्या सूचना देण्यात आल्या आहेत. पाटबंधारे विभागाने याबाबतचे पत्र संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना पाठवले असून, आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा सज्ज राहण्याचे आदेश यात दिले आहेत.

# बोगस शिक्षक भरती घोटाळा

## राज्यातील शिक्षकांच्या पगारांना लागला ब्रेक

बीड-पुणे । प्रतिनिधी

बीडसह नागपूर, मुंबई उपनगर, नाशिक, अमरावती, लातूर आदी जिल्ह्यांमध्ये बोगस शिक्षक भरतीचे प्रकरण चांगलेच गाजले असताना याची चौकशी करण्यासाठी पुणे शिक्षण संचालकांच्या अध्यक्षतेखाली एसआयटीची स्थापना करण्यात आली आहे. त्यामुळे ऑगस्ट महिन्यातील खासगी प्राथमिक आणि माध्यमिक शाळातील शिक्षकांच्या वेतनासाठी मुख्याध्यापकांना कागदपत्र सादर करावी लागणार आहेत. त्यामुळे ऑगस्ट महिन्यात शिक्षकांच्या पगाराला ब्रेक लागला आहे.




राज्यातील अनेक शिक्षण संस्थाच्या अध्यक्ष संचालक मंडळाने नियमबाह्य शिक्षकांची भरती केली. विशेषता शिक्षक भरती करताना नियमाची पायमल्ली करण्यात आली. कोणताही शालार्थ आयडी नसतानाही लाखो रुपये घेऊन नियुक्त्या दिल्या गेल्या आणि कोट्यवधी रुपये जमा केले. परंतु हे प्रकरण काही सामाजिक कार्यकर्त्यांनी पुढे आणले त्यात नागपूर विभागात मोठ्या प्रमाणात शिक्षक भरती घोटाळा झाल्याचे उघड झाले. तात्कालीन शिक्षणाधिकारी, गटशिक्षणाधिकारी त्याचबरोबर वेतन पथकाचे अधीक्षक यांच्यावर गुन्हे दाखल करण्यात आले असून, त्यांची चौकशी सुरू आहे. केवळ नागपूरच नव्हे तर पान २ वर

### बीड, नागपूर एसआयटीच्या रडारवर!

नागपूर विभागामध्ये मोठ्या प्रमाणात शिक्षक शिक्षकेतर भरती घोटाळा उघडकीस आला याप्रकरणी शिक्षण अधिकारी तात्कालीन गटशिक्षणाधिकारी वेतन पथक अधीक्षक यांच्यावर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत, त्याचप्रमाणे बीड जिल्ह्यात देखील मोठ्या प्रमाणात अपात्र शिक्षकांची भरती करण्यात आल्याने बीड आणि नागपूर एसआयटीच्या रडारवर आहेत.

### राहुल गांधी यांची बिहारमध्ये वोट अधिकार यात्रा !



नवी दिल्ली । वृत्तसेवा

काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी बिहारमध्ये मतदान अधिकार यात्रा काढण्याचे ठरवले आहे. १६ दिवसांची ही यात्रा असणार आहे. ती २३ जिल्ह्यातून जाणार आहे. सुमारे १३०० हून अधिक किलोमीटरची ही यात्रा असणार आहे.

**आजपासून सुरुवात : १६ दिवस, २३ जिल्हे, १३०० किलोमीटर प्रवास**

या यात्रेद्वारे गांधी हे निवडणूक आयोगाच्या मतदार यादीत झालेल्या पान २ वर

### बीड जिल्ह्याच्या सर्वांगिण विकासासाठी राज्य शासन कटिबद्ध - अजित पवार

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्याचा कृषी, सामाजिक, शैक्षणिक, आरोग्य, आर्थिक, सांस्कृतिक, उद्योग व क्रीडा आदी क्षेत्रातील सर्वांगिण विकासासाठी राज्य शासन कटिबध्द असून, जिल्ह्याचा पालकमंत्री म्हणुन याकरीता सर्वत्तोपरी प्रयत्न करणार असल्याचे प्रतिपादन राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी केले.



येथील जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रांगणात ७९ व्या स्वातंत्र्य दिनानिमित्त उपमुख्यमंत्री श्री. पवार यांच्या हस्ते मुख्य शासकीय ध्वजारोहण सोहळा पार पडला, त्याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी आमदार सर्वश्री संदीप क्षीरसागर, विजयसिंह पंडित, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, जिल्हा पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहेमान यांच्यासह सर्व कार्यालय प्रमुख, अधिकारी यांची उपस्थिती होती. यावेळी पान २ वर

### खा.सोनवणे भरपावसात शेतकऱ्यांच्या बांधावर



बीड । प्रतिनिधी

सलग दोन दिवस धो-धो पाऊस...केज तालुक्यात मांजरा नदीतील पाण्याने पात्र सोडले. संपूर्ण मांजराकाठ आणि जवळपास सात गावातील नदीपात्रा शेजारील शेतात पाणी शिरले... उभे पिक वाहून गेलेच पण शेतीही खरडून गेली... डोळ्यादेखत होत्याचे नव्हते झाले. अनेकांच्या राहत्या घराचीही पडझड झाली. यावेळी ज्यांच्या त्यांच्या डोळ्यात पाणी उतरले. दुपारी १२ वाजता खा.सोनवणे यांना यानगावांमधून फोन आले. यानंतर सोनवणे यांनी नियोजीत दौरा रद्द करून तातडीने क्षतीग्रस्त गावे गाठली. यावेळी पाऊस सुरूच होता. पडत्या पावसात खा.सोनवणे शेतात पोहचले. नुकसानीची पाहणी केली. शेतकऱ्यांशी संवाद साधला आणि नुकसान भरपाई मिळवून देण्यासाठी आपण प्रयत्न करू, असा शब्दही शेतकऱ्यांना दिला.

### शिर्डीत बापाने ४ मुलांसह घेतली विहिरीत उडी

अहिल्यानगर । प्रतिनिधी

अहिल्यानगर जिल्ह्यातील राहता येथे हृदय पिळवून टाकणारी घटना घडली असून, एकाच कुटुंबातील ५ जणांनी आपले जीवन संपवले आहे. विशेष म्हणजे, वडिलांनी आपल्या चार लहान मुलांसह विहिरीत उडी घेत आत्महत्या केली आहे.

बायको नांदायला येत नाही म्हणून बापाने आपल्या ४ अपत्यांसह जीवन संपवल्याने जिल्ह्यात खळबळ उडाली असून, हळहळ व्यक्त होत आहे. घटनेची माहिती मिळताच स्थानिक पोलीस प्रशासनाने घटनास्थळी धाव घेतली. अरुण काळे पान २ वर

### उपमुख्यमंत्री अजित दादांचा संताप पदाधिकाऱ्याला चांगलेच झापले!

बीड प्रतिनिधी

जिल्ह्याचे पालकमंत्री तथा उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचा स्वातंत्र्यदिनी सकाळीच 'संताप' पाहायला मिळाला. १५ ऑगस्ट रोजी ध्वजारोहणासाठी बीड मुक्कामी आलेल्या दादांनी, निवेदन घेऊन आलेल्या एका व्यापारी संघटनेच्या पदाधिकाऱ्याला शासकीय विश्रामगृहावर चांगलीच झाप दिली. ध्वजारोहणाआधी सकाळीच कार्यकर्त्यांना भेटण्यासाठी दादांनी वेळ दिला होता. त्यावेळी व्यापारी संघटनेचा कार्यकर्ता निवेदन घेऊन आला. मात्र निवेदन दिल्यानंतर ते अजित दादांनी वाचण्याआगोदरच थेट महामंडळातील नियुक्त्यांबाबत बोलू लागला. एवढ्यावर दादा चिडले. ''अरे बाबा, तुला काही कळतंय का? आधी मला निवेदन वाचू दे. महामंडळाच्या नियुक्त्या माझ्या एकट्याच्या हातात नाहीत. आमचं सरकार तीन पक्षांचं आहे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि मी. आम्ही एकत्रित निर्णय घेतो. जर ते महामंडळ माझ्या वाट्याला आलंच नाही, तर मी काय बोलणार? आणि दुसऱ्या पक्षाच्या वाट्याला पान २ वर

### बीड शहरासाठी मोठा दिलासा !

■ १५ प्रमुख रस्त्यांसाठी मिळणार १०० कोटींहून अधिक निधी

**उपमुख्यमंत्री ना.अजितदादा पवार यांची ग्वाही; डॉ.योगेश क्षीरसागरांचा सातत्याने पाठपुरावा**

बीड । प्रतिनिधी

येथील नगरपरिषद हद्दीतील प्रमुख डीपी रस्त्यांचे सिमेंट कॉंक्रीट बांधकाम व नाली सुधारणा करण्यासाठी लवकरच १०० कोटींहून अधिक निधी मिळणार असल्याचे आश्वासन उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी दिले आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी सन २०२३ मध्ये पान २ वर



### बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.१४ ऑगस्ट २०२५**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| शेतमाल | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ४५.५० क्विंटल | २,५५० | २,८७६ | २,६७० |
| ज्वारी/हायब्रिड :२३.५० क्विंटल | २,१२० | ३,४५० | २,५४४ |
| मका/लोकल:१.५० क्विंटल | २,१०४ | २,१०४ | २,१०४ |
| तूर : १.०० क्विंटल | ६,१५० | ६,१५० | ६,१५० |
| उडीद : १.५० क्विंटल | ५,००० | ५,००० | ५,००० |
| बाजरी: ३४.५० क्विंटल | २,००० | २,९६० | २,६४२ |
| मुग: १.०० क्विंटल | ७,१५० | ७,१५० | ७,१५० |
| सोयाबीन: ४.५० क्विंटल | ४,७०० | ४,७०० | ४,७०० |
| हरभरा: १०.५० क्विंटल | ५,५०१ | ६,००१ | ५,८४३ |

# राज्यातील विद्यार्थ्यांना मोफत डिजिटल शिक्षण

## खान अकॅडमी - महाराष्ट्र सरकारसोबत करार, ६२ हजार शाळांना फायदा

मुंबई । प्रतिनिधी

खान अकॅडमी इंडिया आणि महाराष्ट्र सरकार आता राज्यातल्या सरकारी शाळांमधील मुलांना त्यांच्या अभ्यासक्रमावर आधारित, चांगल्या दर्जाचे डिजिटल शिक्षण साहित्य मोफत देणार आहे. यासाठी ५ वर्षांचा करार झाला आहे. या करारावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, शिक्षणमंत्री दादासाहेब भुसे आणि राज्यमंत्री पंकज भोयर आणि खान अॅकॅडमीच्या व्यवस्थापकीय संचालक, स्वाती वासुदेवन उपस्थित होत्या.



डॉ. जयंत नारळीकर गणित आणि विज्ञान अध्ययन समृद्धी कार्यक्रमांतर्गत, खान अकॅडमीचे डिजिटल साहित्य राज्यातल्या ६२,००० पेक्षा जास्त सरकारी शाळांमध्ये वापरले जाईल. या कार्यक्रमांतर्गत, राज्यातील विद्यार्थ्यांना खान अकॅडमीचे जागतिक दर्जाचे, राज्य अभ्यासक्रमाशी पूर्णपणे संलग्न असलेले गणित आणि विज्ञानाचे साहित्य मराठी आणि इंग्रजी भाषेत आयुष्यभर विनामूल्य उपलब्ध होईल. हे साहित्य सगळ्या शाळा, शिक्षक आणि मुलांपर्यंत व्यवस्थित पोहोचावे, यासाठी खान पान २ वर

### ४८८ शाळांपासून झाली होती सुरुवात

खान अकॅडमी इंडियाच्या व्यवस्थापकीय संचालक, स्वाती वासुदेवन म्हणाल्या, महाराष्ट्रामध्ये आमची सुरुवात ४८८ शाळांपासून झाली होती, आणि आता आम्ही संपूर्ण राज्यात पोहोचायला तयार आहोत. शिक्षणामुळे फक्त एका व्यक्तीचा नाही, तर संपूर्ण समाजाचा विकास होतो, यावर आमचा विश्वास आहे आणि ही भागीदारी त्याचाच एक पुरावा आहे.

### चोरीतील आरोपी मुद्देमालासह परळी पोलिसांनी पकडला

परळी । प्रतिनिधी

अंबाजोगाई बस स्थानकातून प्रवाशाचे सोन्याचे दागिने आणि इतर साहित्य असा अडीच लाख रुपयांचा मुद्देमाल चोरी गेला होता याप्रकरणी परळी संभाजीनगर पोलिसांनी तपास करून खोकर मोहा तालुका शिरूर कासार येथील आरोपीला मुद्देमालासह वेड्या ठोकल्या



फिर्यादी नामे नाथराव माणिकराव फड वय ६७ वर्षे व्यवसाय सेवानिवृत्त रा.शंकर पार्वती नगर परळी वै. ता. परळी वै, जि. बीड यांनी पोलीस स्टेशन संभाजीनगर परळी वै, येथे फिर्याद दिली बस स्थानक येथुन अंबाजोगाई येथे जाण्यासाठी पान २ वर

cmyk

## अग्रलेख

# सरकारची रोज कोंडी !

महायुती सरकारकडे स्पष्ट बहुमत आहे, मात्र सरकारमधील तीन पक्षांमध्ये आलबेल नसल्याने विशेषत: मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यात असलेल्या सुप्त संघर्षात सरकारची रोज कोंडी होताना दिसत आहे. एकनाथ शिंदे यांना पुन्हा राज्याचे मुख्यमंत्री व्हायचे आहे, मात्र भाजपकडून त्यांना प्रतिसाद मिळत नाही. शिंदे यांना मुख्यमंत्री करण्याचे आश्वासन दिल्याचे काही शिवसेनेचे नेते सांगतात, मात्र शिंदेंनी तसे अजुन जाहीरपणे सांगितलेले नाही. त्यामुळे शिंदे गटातील मंत्री आणि आमदार हे सातत्याने सरकार विरोधी कारवाया करत असल्याचे देखील बोलले जात आहे.

फडणवीस हे राजकारणात चांगले मुरलेले आहेत, भाजपांर्तगत विरोधकांना त्यांनी मुख्यमंत्री पदाच्या पहिल्याच टर्ममध्ये शांत केले. मात्र एकनाथ शिंदे यांचा स्वतंत्र पक्ष असल्याने तसेच २०२२ ला उध्दव ठाकरे यांचे सरकार घालवण्यात, तसेच शिवसेना फोडण्यात शिंदे यांनी घेतलेली रिस्क त्यामुळे शिंदे यांना भाजपचे वरीष्ठ नेते अमित शहा यांचा थेट ॲक्सेस आहे. याचाच फायदा घेत शिंदे यांनी भाजपातील दिल्लीतील वर्तुळात आपली जागा करण्याचा सातत्याने प्रयत्न केला. लोकसभा आणि विधानसभा निवडणूक महायुती म्हणून शिवसेना - भाजपने एकत्र लढविली. विधानसभा निवडणूकीत महायुती राज्यात बहुमताने सत्तेवर आली, लाडकी बहीण योजना आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वात हा विजय मिळाल्याचे सांगत शिवसेनेने मुख्यमंत्री पदासाठी दावा केला. मात्र भाजपने शिंदे यांना ना गृहमंत्री खाते दिले ना मुख्यमंत्री, त्यानंतर शिवसेना आणि भाजपात कधी पालकमंत्री तर कधी अधिकाऱ्यांच्या नियुक्त्या तर कधी लाडक्या बहीण योजनेसाठी वळवलेला निधी यावऊन वाद होत होते. पावसाळी अधिवेशन काळातच शिंदे गटाच्या मंत्र्यांचे आणि आमदारांचे कारनामे बाहेर आल्याने पावसाळी अधिवेशनात शिंदे गटाची चांगलीच कोंडी झाली.

पावसाळी अधिवेशनात बॅकफुटवर गेलेले एकनाथ शिंदे हे अजुनही बॅकफुटवर आहेत, त्यात भर पडली ती ठाकरे बंधूंच्या मनोमिलनाची. त्यामुळे शिंदे गट हा कधी पक्ष आणि चिन्हाच्या निकालामुळे तर कधी पक्षाच्या विलीनीकरणाच्या चर्चेने अस्वस्थ दिसत आहे. दुसरीकडे शिंदे गटाच्या मंत्र्यांवर झालेल्या आरोपानंतर शिवसेना ठाकरे गट आक्रमक झाला आहे. सरकारमधील भ्रष्ट आणि कलंकित मंत्र्यांचा राजीनामा घेण्यासाठी मुख्यमंत्री आणि राज्यपालांना देखील शिवसेना ठाकरे गटाचे आमदार भेटले. गुरूपौर्णिमेपासून शिंदेंच्या दिल्लीवारी सुरू झाल्या आहेत. त्या वाऱ्या सुरूच असून शिंदे यांना दिल्लीश्वरांकडून ठोस आश्वासन मिळत नसल्याचे बोलले जात आहे. महायुतीकडे स्पष्ट बहुमत आहे. गेली दोन अधिवेशन विरोधीपक्ष नेता नाही, तरी केवळ मित्रपक्षांमध्येच सुरू असलेल्या राजकारणामुळेच सरकारची रोज कोंडी होताना दिसत आहे. त्यातच राहुल गांधी यांनी विधानसभा आणि लोकसभा निवडणूकीतील मतदानाबाबत उपस्थित केलेल्या शंकांबाबत देशात भाजपविरोधी वातावरण तयार झालले आहे.

शरद पवार आणि संजय राऊत यांनी १६० जागांबाबत केलेल्या गौफ्यस्फोटामुळे सरकारची कोंडी झाली आहे. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर महायुतीत एकवाक्यता नाही, त्यातच ठाकरे यांच्या शिवसेनेने सरकार विरोधात उभे केलेले जनआक्रोश आंदोलन आणि आंदोलनात स्वत: उध्दव ठाकरे यांनी रस्त्यावर उतरणे ही सरकारला धोक्याची घंटा आहे. जेव्हा जेव्हा सरकारच्या विरोधात कोणी मोठे आंदोलन उभे करतो तेव्हा मुख्यमंत्री म्हणून देवेंद्र फडणवीस हे त्या आंदोलनाची किंवा मोर्चाची एक तर दखल घेत नाहीत किंवा सरकार म्हणून आंदोलनाची तीव्रता लक्षात घेता वेळीच निर्णय घेताना दिसले. एकीकडे दिल्लीत निवडणूक आयोगाच्या कार्यालयावर विरोधी पक्षाच्या सर्व खासदारांनी काढलेला मोर्चा, त्यात उपराष्ट्रपती धनखड यांच्या राजीनाम्यानंतर त्यांच्याबाबत तयार झालेले संशयाचे धुके, त्यातच मित्रपक्षांच्या भ्रष्ट मंत्र्यांच्या कारनाम्यामुळे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे कुठेतरी बदनाम होत आहेत. फडणवीस हे चिफ मिनिस्टर नाही तर थिफ मिनिस्टर असल्याचा आरोप विरोधकांकडून केला जात असल्याने आता मुख्यमंत्री फडणवीस विरोधकांच्या या आरोपांना कसे उत्तर देतात हे बघणे महत्त्वाचे ठरणार आहे.

# दैव बलवत्तर म्हणून पुलावरून वाहून गेलेले राजाभाऊ टिंगरे सुखरूप!

## आता पुलांची उंची वाढवा, नाहीतर पुढच्यावेळी जीव वाचणार नाहीत; नागरिकांचा आक्रोश

बीड प्रतिनिधी

बीड तालुक्यातील सात्रा पोथरा, मुर्शदपूर घाट परिसरात १५ ऑगस्ट, शुक्रवार रोजी पहाटे घडलेली घटना थरारक ठरली. पोथरा गावातील रहिवासी राजाभाऊ रामचंद्र टिंगरे (वय अंदाजे ५० वर्षे) हे काशेश्वरी देवीच्या दर्शनासाठी जात असताना मुसळधार पावसामुळे भरून वाहणाऱ्या नदीच्या पुलावरून पाण्यात वाहून गेले. जवळपास तीन ते चार तास सुरू असलेल्या शोधमोहीमेनंतर गावकऱ्यांनी त्यांना उसाच्या शेतातील गाळामध्ये अडकलेल्या अवस्थेत सुखरूप बाहेर काढले. त्यांचा जीव वाचल्याने संपूर्ण परिसराने सुटकेचा नि:श्वास सोडला.

गुरुवार दुपारी तीन वाजल्यापासून सात्रा पोथरा परिसरात मुसळधार पावसाची संततधार सुरू होती. परिणामी खडकी व पोथरा-मुर्शदपूर घाट येथील तलाव भरून वाहू लागले. त्याचा थेट परिणाम स्थानिक नद्यांवर झाला. दोन्ही पुलांवरून पाणी ओसंडून वाहत होते. या पुलांची उंची कमी असल्याने पाण्याचा वेग प्रचंड होता. नागरिकांच्या लक्षात येण्याइतपत ही परिस्थिती भीषण झाली होती. राजाभाऊ टिंगरे यांना धोका लक्षात आला नाही. पुलाच्या मध्यापर्यंत ते गेले आणि अचानक पाय घसरल्याने ते थेट पाण्याच्या प्रवाहात वाहून गेले. या घटनेची माहिती मिळताच




गावकऱ्यांनी नदीकाठी एकत्रित येत तात्काळ शोधमोहीम हाती घेतली. जवळपास चार तास चाललेल्या प्रयत्नांनंतर शेवटी टिंगरे उसाच्या शेतातल्या गाळामध्ये अडकलेले दिसले. ग्रामसेवक संजय सानप यांच्या उपस्थितीत गावकऱ्यांनी त्यांना बाहेर काढले आणि घरी सुखरूप पोहोचवले.

गावकऱ्यांनी या घटनेची माहिती तहसीलदार चंद्रकांत शेळके यांना दिल्यानंतर त्यांनी तातडीने सुत्रे हलवली. मंडळ अधिकारी पंडित नाईकवाडे, ग्रामपंचायत अधिकारी संजय सानप व महसूल पथकाला घटनास्थळी पाठवण्यात आले. अधिकाऱ्यांनी दुर्घटनाग्रस्त टिंगरे यांच्या तब्येतीची चौकशी केली, दवाखान्यात नेण्याचा सल्ला त्यांनी दिला तसेच गावकऱ्यांना धीर दिला. या कृतीबद्दल गावकऱ्यांनी तहसीलदार शेळके व त्यांच्या टीमचे आभार मानले. सरपंच अमोल लंबाटे, उपसरपंच दिलीप हावळे व इतर पदाधिकारी घटनास्थळी धावून आले आणि कुटुंबीयांना दिलासा दिला.

### पुलांची उंची वाढवा - ग्रामस्थ

घटनेनंतर नागरिकांनी प्रचंड संताप व्यक्त केला. ''या पुलांची उंची वर्षानुवर्षे कमीच आहे. प्रत्येक पावसाळ्यात पाणी पुलावरून वाहते. कोणाचा जीव गेला तर जबाबदार कोण?'' असा सवाल नागरिकांनी केला. पुलांची तातडीने उंची वाढवावी आणि मजबुतीकरण करावे. नदी-नाल्यांवर पाणी इशारा देणारी यंत्रणा उभी करावी. पावसाळ्यात पुलांवर तात्पुरते सुरक्षा बॅरिकेड्स लावावेत. जनजागृती शिबिरे घेऊन नागरिकांना धोका समजावून द्यावा. आपत्कालीन परिस्थितीसाठी तात्काळ मदत पथके उपलब्ध करून द्यावीत, अशा मागण्या ग्रामस्थांनी केल्या आहेत.

### अधिकाऱ्यांचे आवाहन

जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी नागरिकांना इशारा दिला आहे की, ''नदी वा नाल्यांवरून पाणी वाहत असताना कोणत्याही परिस्थितीत पुलावरून जाण्याचा प्रयत्न करू नये. प्रशासनाच्या सूचनांचे काटेकोर पालन करावे.'' उपविभागीय अधिकारी कविता जाधव यांनी ''पावसाळ्यात अनावश्यक प्रवास टाळावा व चेतावणींचे पालन करावे'' असे आवाहन केले. निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी ''मुले व वृद्धांना नदी-नाल्याजवळ जाऊ देऊ नये, आणि धोका दिसताच प्रशासनाला माहिती द्यावी'' अशी सूचना केली.

# कै दत्तासाहेब देशमुख माध्यमिक विद्यालयात दहीहंडी साजरा

घनसावंगी । प्रतिनिधी

येथील मत्स्योदरी शिक्षण संस्थेच्या कै.दत्तासाहेब देशमुख माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय दहीहंडी उत्सव साजरा करण्यात आला त्यावेळी शाळेचे मुख्याध्यापक तथा प्राचार्य केशव अटकर हे कार्यक्रमाचे अध्यक्ष होते तर प्रमुख मार्गदर्शक संतोष लिंगणवाड होते मुख्याध्यापक केशव अटकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना कृष्णाचा जन्म कधी व कसा झाला कृष्ण अवतार कार्याबद्दल मार्गदर्शन केले,पुढे त्यांनी राम जन्म व कृष्ण जन्म याबद्दल माहिती देताना कृष्णाचा जन्म हा रात्री बारा वाजता तर रामाचा जन्म दुपारी बारा वाजता झाला राम व कृष्ण या दोन्ही अवताराची माहिती देताना राम नामाच आचरण करावे व कृष्ण नामच उच्चारण करावे असे सांगितले,

इयत्ता सातवी आठवीच्या मुलींनी गोविंदा पथकाचे मानवी मनोरे तयार करून उंच ठिकाणी बांधलेली दहीहंडी फोडली. त्यावेळी कॉलेजचे प्राध्यापक व शाळेचे सर्व शिक्षक उपस्थित होते . कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी बरजंग मोरे आणि गीताराम शिंदे यांनी प्रयत्न केले.सूत्रसंचालन बजरंग मोरे यांनी केले तर आभार प्रदर्शन राजेंद्र सानप यांनी केले.

पान १ वरून...

### राज्यभरात धों धों...!

अक्षरशः झोडपून काढले. या पावसामुळे जिल्ह्यातील नद्यांनाल्याच्या पाणीपातळीत झपाट्याने वाढ होत असून, काही नद्या इशारा पातळीनजीक पोहोचल्या आहेत. कोयना धरणाच्या क्षेत्रातही दमदार पाऊस सुरू आहे, धरण क्षेत्रातील कोयना १०४, नवजा १७४, महाबळेश्वर ११७ मिलिमीटर पाऊस झाला असून धरणात प्रति सेंकद १९,००८ क्युसेक पाण्याची आवक होत आहे. धरणात शनिवारी सकाळी आठ पर्यंत ८९.९३ टीएमसी (८५.४४ टक्के) पाणीसाठा झाला आहे. धरण क्षेत्रात मुसळधार पाऊस सुरू असल्याने धरणात पाण्याची आवक मोठ्या प्रमाणात होत आहे. शनिवारी दुपारी तीन वाजता कोयना धरण पायथा विद्युतगृहाचे दोन्ही युनिट सुरू करून २१०० क्युसेक विसर्ग कोयना नदीपात्रात सोडण्याच्या निर्णयाने नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा देणेत आला आहे. मराठवाड्यात सर्वत्र जोरदार पाऊस कोसळताना दिसत आहे. या पावसामुळे खरिपातील पिकांना पोषक वातावरण झाले असले तरी सततच्या पावसामुळे शेतकऱ्यांच्या सोयाबीन, कपाशी, काढणीला आलेले मुग, उडीद या पिकांना फटका बसत आहे. मराठवाड्यातील आठही जिल्ह्यांत पाऊस असून, काही ठिकाणी अतिवृष्टी झाली असल्याचे दिसत आहे. यात परभणी जिल्ह्यातील पाच व हिंगोली जिल्ह्यातील एका मंडलात अतिवृष्टी झाली आहे तर बीड जिल्ह्यातील माजलगाव तालुक्यात कोथाळा, साळेगाव, मोगरा, गावासह परिसरातील तब्बल पंधरा गावात अतिवृष्टी सदृश्य पाऊस झाला आहे. अनेक ठिकाणी नदीनाले, ओढ्याचे पाणी पिकांमध्ये शिरले. जमिनी खरडून गेल्यामुळे हळद, ऊस, सोयाबीन, कपाशी, तूर आदींसह भाजीपाल्याचे नुकसान झाले. अहिल्यानगर जिल्ह्यातील मुळा, भंडारदरा, निळवंडे धरण भरली आहेत. तर अहिल्यानगर, कर्जत, जामखेड, शेवगाव, पाथर्डी, राहुरी, राहाता, कोपरगावसह जिल्हाभरातील अनेक भागांत पावसाने हजेरी लावली आहे. खानदेशात सुमारे २२ ते २५ दिवसांनंतर अनेक भागांत पावसाने हजेरी लावली. काही भागांत जोरदार पाऊस झाला. माती वाहून जाणे, शेत खरडणे असे प्रकारही नदीकाठी, नद्यांच्या लगत झाले आहेत. पण पावसाने काहीसा दिलासाही मिळाला आहे. खानदेशात नंदुरबार, धुळे व जळगावात सर्वत्र कमी व बऱ्यापैकी स्वरुपातील पाऊस झाला आहे. जळगाव, धरणगाव भागात लहान नाले प्रथमच खळखळून वाहू लागले आहेत. विदर्भातील अमरावती, यवतमाळ जिल्हयात ढगफुटी सदृष्य पावसाचा सोयाबीन, कपाशीसह संत्रा बागांना देखील मोठा फटका बसला आहे. चांदूर बाजार तालुक्यात पावसाने एकच हाहाकार उडाला. उमरखेड, महागाव, पुसद (यवतमाळ) भागात जोरदार पावसाने हजेरी लावल्याने अनेक भागात पूरसदृष्य स्थिती निर्माण झाली आहे. अकोला जिल्ह्यातील मूर्तीजापूर तालुक्यातील लाखपूरी सर्कलमध्ये शनिवारी झालेल्या मुसळधार पावसामुळे ढगफुटीसदृश परिस्थिती निर्माण झाली.

### बोगस शिक्षक भरती

बीड, पुणे विभाग, मुंबई उपनगर, चंद्रपूर आदी भागामध्ये असाच शिक्षक भरती घोटाळा झाल्याचा संशय असल्याने, राज्य शासनाने या शिक्षक भरती घोटाळ्याच्या चौकशीसाठी एसआयटीची स्थापना केली आहे. एसआयटीने आपली चौकशी सुरू केली असून, त्यांनी आता वेतन पथकाचे अधीक्षक यांची कसून चौकशी केली आहे. शालार्थ आयडी कधी दिल्या गेल्या, शिक्षकांना नियुक्ती देताना शासन नियमाचे पालन करण्यात आले की नाही, त्यासाठी कोणता फार्मूला वापरला गेला. विशेषतः २०१२ पासून शिक्षक भरती बंद आहे. याशिवाय भरती करताना शिक्षकांना टीईटी परीक्षा पास होणे बंधनकारक असताना अनेक संस्था चालकांनी जवळच्या नातेवाईकासह लाखो रुपये गोळा करून शिक्षक- शिक्षकेतर कर्मचारी यांची भरती केली. आता या सर्व प्रकारची एसआयटी चौकशी सुरू असल्यान तपासणी पूर्ण होईपर्यंत पगार अदा केले जाणार नसल्याचे खात्रीलायक वृत्त आहे. जर पगार अदा करायचे असतील तर संबंधित मुख्याध्यापकाने संबंधित शिक्षकाचा नियुक्तीचा कार्यकाळ, शालार्थ आयडी संबंधित शिक्षकाची सर्व कागदपत्रे सादर करणे बंधनकारक आहे. त्यामुळे आता ऑगस्ट महिन्यात या सर्व शिक्षक- शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या पगारांना ब्रेक लागला आहे.

**पगारासाठी द्यावे लागणार हे कागदपत्र!**

ऑगस्ट पासून नव्या जुन्या सर्वच शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना नोकरीवर रुजू झाल्याचा दिनांक. २०१२ पूर्वी रिक्त जागेसाठी आलेल्या जाहिरातीचा पुरावा, शालार्थ आयडी, जात प्रमाणपत्र, संबंधित संस्थेने रिक्त जागेसाठी शिक्षण अधिकारी शिक्षण संचालक यांच्याकडे केलेला पाठपुरावा, उमेदवाराचे सेवा कार्यकाळ आणि पवित्र पोर्टल वरील नोंदीचा पुरावा. पिटी पास झाल्याचे प्रमाणपत्र आदी कागदपत्रे मुख्याध्यापकाने पगारावेळी सादर करणे बंधनकारक करण्यात आले आहे.

### बीड जिल्ह्याच्या सर्वांगिण

उपमुख्यमंत्री श्री. पवार यांनी भारतीय स्वातंत्र्याच्या ७९ व्या स्वातंत्र्य दिनानिमित्त राज्यातील नागरिकांना शुभेच्छा देत म्हणाले की, देशाच्या स्वातंत्र्यलढ्यात योगदान दिलेल्या स्वातंत्र्यवीरांना, क्रांतीकारकांना, हौतात्म्य पत्करलेल्या शहिद वीरांना, अभिवादन केले आहे. असंख्य ज्ञात-अज्ञात स्वातंत्र्यसैनिकांच्या त्यागातून मिळालेले स्वातंत्र्य, देशाची एकता, अखंडता, सार्वभौमता अबाधित ठेवण्यासाठी सर्वांनी वचनबद्ध होऊया, सामाजिक जाणीव, राष्ट्रीय कर्तव्य-जबाबदारीच्या भावनेतून राष्ट्रविकासात योगदान देऊया. स्वातंत्र्यदिन हा आपल्यासाठी सर्वात मोठा राष्ट्रीय उत्सव आहे. हा उत्सव तितक्याच उत्साहात, आनंदात, व्यापक स्वरुपात साजरा करायचा आहे. देशाचे स्वातंत्र्य, सार्वभौमत्व, लोकशाही मूल्यांच्या रक्षणासाठी आपण सर्वांनी एकजूट होऊन देशाला समृद्ध, बलशाली देश बनवण्याचा निर्धार करुया.मराठवाड्याची भूमी ही संतांची, शूर-वीरांची, बुद्धीवंत, कर्तृत्ववानाची भूमी आहे. मराठवाड्याला सहजासहजी काही मिळालं नाही, जे काही मिळालं ते संघर्ष करुनंच मिळाले आहे. देशाला १५ ऑगस्ट, १९४७ रोजी स्वातंत्र्य मिळाले, परंतू मराठवाड्याला १७ सप्टेंबर, १९४८ रोजी स्वातंत्र्य मिळाले. त्यासाठी सर्वसामान्य जनतेला, निजामाच्या सैन्याशी लढावे लागले. त्या त्यागाचं स्मरण करुन, त्यांना अभिवादन करणे हे आपले कर्तव्य आहे. मराठवाडा मुक्तीसंग्रामाचे स्वामी रामानंद तीर्थ यांनी नेतृत्वं केले होते. तसेच दिगंबरराव बिंदू, गोविंदभाई श्रॉफ, रविनारायण रेड्डी, देवीसिंग चौहान, भाऊसाहेब वैशंपायन, विजयेंद्र काबरा, बाबासाहेब परांजपे यांच्यासारख्या नेत्यांनी त्यांना भक्कम साथ दिली होती. मराठवाडा मुक्तीसंग्रामात प्रत्येक गावातल्या लोकांनी सहभाग घेतला होता, हे या लढ्याचं वैशिष्ट्य होते. आपल्या बीडच्या विठ्ठलराव काटकरांनी निजामाच्या रोहिल्यांना जेरीस आणण्याचं काम केलं होतं.त्यांच्यासोबत काशिनाथ जाधव आणि हिरालाल कोटेचा हे भूमीपूत्र सुध्दा लढ्यात अग्रभागी होते.

### राहुल गांधी यांची

कथित फेरफाराविरोधात आवाज उठवणार आहेत. या यात्रेचे नेतृत्व काँग्रेसकडून होत असून, महाआघाडीतील सर्व घटक पक्ष यात सहभागी होत आहेत. रविवारी (१७ ऑगस्ट) पासून सुरू होणारी ही यात्रा बिहारमधील २३ पेक्षा अधिक जिल्ह्यांमधून जाईल. या मोहिमेचा उद्देश म्हणजे लोकांना त्यांच्या मतदानाच्या अधिकाराविषयी जागरूक करणे आणि एकाही मतदाराचे नाव यादीतून वगळले जाऊ नये, याची खात्री करणे. राहुल गांधी यांनी 'एक व्यक्ती, एक मत' या लोकशाहीच्या मूलभूत तत्त्वावर जोर देत याला 'संविधान वाचवण्याची लढाई' म्हणून संबोधले आहे. ''आम्ही मतदार अधिकार यात्रा लोकांपर्यंत घेऊन जात आहोत. हा आपल्या लोकशाही हक्काचे रक्षण करण्याचा लढा आहे,'' असे त्यांनी सोशल मीडियावर पोस्ट केले.

**वोटबंदी की लोकशाहीचा धोका?**

या प्रकरणाला खळबळजनक वळण तेव्हा मिळाले जेव्हा विरोधकांनी निवडणूक आयोगाच्या विशेष मतदार यादी पुनरावलोकन प्रक्रियेवर आक्षेप घेतला. त्यांनी या संपूर्ण प्रक्रियेला 'वोटबंदी' असे संबोधून निवडणूक आयोगावर सत्ताधारी भाजपशी संगनमत असल्याचा आरोप केला. राहुल गांधी यांनी ७ ऑगस्ट रोजी पुराव्यानिशी मतचोरी कशी होते हे सांगितले. त्यांनी कर्नाटकमधील महादेवपूरा विधानसभा मतदारसंघातील माहितीचा दाखला देत, निवडणूक आयोग आणि भाजपमधील कथित संगनमताचे आरोप केले.

### शिर्डीत बापाने ४

(वय ३० वर्षे) राहणार चिखली कोरेगाव, तालुका श्रीगोंदा असे बापाचे नाव आहे. शिवानी अरुण काळे (वय ८), प्रेम अरुण काळे (वय ७), वीर अरुण काळे (वय ६), कबीर अरुण काळे (वय ५) अशी मृतांची नावे आहेत. कौटुंबिक वादा-वादीमुळे बायको ८ दिवसांपूर्वीच येवला येथे माहेरी गेली होती. एक हात आणि एक पाय दोरीने बांधलेल्या अवस्थेत विहिरीत अरुण काळे यांचा मृतदेह आढळला असून स्वत: हात पाय बांधून आत्महत्या केल्याची शक्यता वर्तवली जात आहे.

### राज्यातील विद्यार्थ्यांना

अकॅडमी इंडिया आणि शिक्षण विभाग एकत्र मिळून काम करतील. एवढेच नाही, तर खान अकॅडमीच्या मदतीने मुले घरीही अभ्यास करू शकतील. यासाठी पालकांनाही यात जोडून घेण्याचा प्रयत्न असेल. महाराष्ट्रातल्या आमच्या भागीदारांसोबत मिळून आम्ही असे भविष्य घडवत आहोत, जिथे कुठल्याही घरातून आलेल्या प्रत्येक मुलाला जगातले सर्वोत्तम शिक्षण मिळेल आणि तो यशस्वी होईल, असा विश्वास मान्यवरांनी यावेळी व्यक्त केला.

### उपमुख्यमंत्री अजित दादांचा

गेलं, तर तुम्हाला तिकडेच जावं लागेल. थोडं कमी बोलायला शिका, आधी दिलेलं निवेदन वाचू द्या!'' अशा शब्दांत अजितदादांनी पदाधिकाऱ्याची चांगलीच कानउघाडणी केली. ध्वजारोहणा आधी घडलेल्या या प्रसंगाची जिल्ह्यात जोरदार चर्चा सुरू असून, कार्यकर्त्यांच्या घाईगडबडीच्या वृत्तीवर दादांनी ब्रेक लावल्याचे बोलले जात आहे.

### बीड शहरासाठी मोठा

महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (राज्यस्तर) २०२३-२४ अंतर्गत एकूण १७ रस्ते व नाली बांधकाम प्रकल्पांसाठी १५९ कोटींचा प्रस्ताव शासनाकडे पाठविला होता. यापैकी २ रस्त्यांची कामे इतर योजनेतून पूर्ण झाली असून, आता उर्वरित १५ कामांसाठी नव्याने सुमारे १०० कोटींचा प्रस्ताव सादर करण्यात येणार आहे. अजितदादा पवार स्वतः निधी वितरणाबाबत बैठक घेणार असून, त्यानंतर मंजुरीची प्रक्रिया पूर्ण होईल. याशिवाय, शहराच्या विकासासाठी अलीकडेच ५ कोटी रुपये घंटागाड्यांसाठी, ७.५० कोटी यशवंतराव चव्हाण नाट्यगृहासाठी, तसेच ६ कोटी टॅक्स सर्व्हेसाठी मंजूर झाले आहेत. दरम्यान, बीड मतदारसंघासाठी भरघोस निधी दिल्याबद्दल ना.अजितदादा पवार यांचे डॉ.क्षीरसागर यांनी आभार मानले आहेत.

### चोरीतील आरोपी

बस मध्ये चढत असताना त्यांचे गळ्यातील सोन्याचा गोप वजन २५ ग्रॅम सध्या किं. अंदाजे २,५०,०००/ रुपयेची सोन्याचा गोप कोणीतरी अज्ञात चोरट्याने चोरले बाबत. पो.स्टे. संभाजीनगर येथे गुन्हा दाखल करण्यात आला होता. पो. नि. ढोणे यांचे आदेशाने सदर गुन्ह्याचा तपास सफौ, सौंदनकर यांचेकडे देण्यात आला. आरोपी नामे प्रकाश श्रीराम जाधव वय ३४ वर्षे रा. हिवरसिंगा ता. शिरूर जि. बीड याने केला असल्याचे निषपन्न झाल्याने पो.स्टे. संभाजीनगर डी.बी. पथक यांनी खोकर मोहा ता. शिरूर जि.बीड येथुन आरोपीला ताब्यात घेवून नमुद आरोपीकडे सखोल तपास करून त्याचेकडून सोन्याचा गौप वजन २५ ग्रॅम किं. अंदाजे २,५०,०००/ रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत केला आहे. गुन्हयाची पुढील कार्यावाही चालु आहे. सदरची कामगीरी वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक डी.एस. ढोणे, रोपोउपनि मिसाळ,संदिनकर, व डी.बी. पथकातील सफौ नागरगोजे, पो साजीद पठाण, चव्हाण, पो डॉगळे, पो घुगे सर्व पो.स्टे. संभाजीनगर यांनी प्रभावीपणे कामगीरी बजावली आहे.

पान ६ वरून...

### प्रशासनाने नियम

संपर्क आपले नाव गुप्त ठेवले जाईल यावेळी उपस्थितांना अमली पदार्थ आम्ही घेणार नाहीत याची शपथ देण्यात आली यावेळी मौलाला मुक्ती साब यांनी गणेश उत्सव व ईद-ए-मिलाद हे दोन्ही कार्यक्रम दोन्ही धर्मीयांनी मिळून मोठ्या आनंदाने साजरी करावे असे आवाहन केले तसेच महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे कैलास दरेकर यांनी तालुक्यामध्ये मोठ्या प्रमाणावर विनापरवाना दारू विक्रीचा मुद्दा मांडून ड्राय डे दिवशी देखील दारू विक्री होते यावर प्रशासनाने कारवाई करावी यावेळी ज्येष्ठ पत्रकार उत्तम बोडखे शरद रेडेकर यांनी देखील काही सूचना केल्या या बैठकीस सादिक कुरेशी सुनील रेडेकर जाकीर कुरेशी पत्रकार अनिरुद्ध धर्म अधिकारी आदी मंडळाचे सदस्य व मुस्लिम बांधव उपस्थित होते.

### स्वत:ची तुलना स्वत:शी करा

केले. त्यांच्या या सादरीकरणातून भारतीय वारसा, संस्कृती आणि स्वातंत्र्याचे खरे मूल्य सर्वांना अनुभवास आले.

शाळेचे प्राचार्य अन्वर शेख यांनी विद्यार्थ्यांना स्वतंत्रपणे अभ्यास करून यशस्वी व्हावे आणि पुन्हा याच शाळेत मुख्य पाहुणे म्हणून यावे असे आवाहन केले. या संदेशामुळे विद्यार्थ्यांमध्ये नवी ऊर्जा आणि आत्मविश्वास निर्माण झाला. या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी शैक्षणिक विभाग प्रमुख जी.बी. ऑगस्टन, सुनिता सुरवसे, धनंजय सोमवंशी, अर्चना जाधव, जिजाराम गडाख, सखाराम जोशी, प्रदीप बुरकुल, देवेंद्र सोळंके आणि सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमास लोकनेते सुंदरराव सोळंके नागरी सहकारी संस्थेचे कार्यकारी अधिकारी सुहास सोळंके आणि पालकवृंद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### आष्टी शहरात स्टंटबाजी

व्यापारी काही नागरिक सायंकाळी फिरण्यासाठी येत असतात मात्र काल दिवसभर पाऊस असल्याने हे नागरिक या रस्त्यावर फिरण्यासाठी आले नाही जर हे लोक रस्त्यावर असते तर फार मोठा अनर्थ झाला असता. ही घटना घडल्यानंतर या ठिकाणी शेकडो नागरिक तरुण जमा झाले. गाडीची दशा पाहिल्यानंतर यातील तरुण मोठ्या प्रमाणात जखमी झाले असतील असा अनेकांनी अंदाज बांधला मात्र नशीब बलवत्तर यांना थोडे देखील खर्चटले केले नाही देव तारी त्याला कोण मारी या म्हणीप्रमाणे या तरुणांचे प्राण वाचले.

### आनंद शैक्षणिक संकुलात

क्रमांक: डिप्लोमा इंजिनिअरिंग विद्यालय.डिग्री विभाग: प्रथम क्रमांक: श्री छत्रपती शाहू फुले आंबेडकर कृषी महाविद्यालय, द्वितीय व तृतीय क्रमांक: बी. फार्मसी महाविद्यालय. तंत्रनिकेतनचे प्राचार्य संजयबोडखे यांनी कु. ऋतुजा पांडुरंग कवाळे हिला उत्कृष्ट देशभक्तीपर गीत ओ देश मेरे गायनाबद्दल १ हजार रुपये बक्षीस दिले.डॉ.अजयदादा धोंडे यांनी आपल्या मनोगतात सर्व सहभागी विद्यार्थ्यांचे व शिक्षकांचे विशेष कौतुक केले. आनंद शैक्षणिक संकुलातील सर्व महाविद्यालयांची उत्तरोत्तर प्रगती होत आहे.अशा प्रकारच्या उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये देशभक्ती, सर्जनशीलता आणि आत्मविश्वास वाढतो असे मत व्यक्त केले.त्यांनी सर्व महाविद्यालयांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आणि संस्थेच्या वतीने अशाच उपक्रमांचे आयोजन पुढेही करण्यात येईल असे सांगितले. ध्वजारोहण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.एल.एस. मिसाळ तर सांस्कृतिक कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.कु.एस.एल.बनकर यांनी केले.आभार प्रदर्शन प्राचार्य डॉ. एस.आर.आरसुळ यांनी केले.कार्यक्रम यशस्वी पार पाडण्यासाठी शारीरिक शिक्षण महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बाळासाहेब खेमगर,डॉ. राजाभाऊ ढोबळे,राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ.ए.एस.पवार यांनी काम केले. एकात्मतेचे आणि देशप्रेमाचे दर्शन घडवणारा हा सोहळा संस्मरणीय ठरला.

### शहरातील सर्व सीसीटिव्ही

कार्यकारी अधिकारी मिन्नू पी.एम., पोलिस अधिक्षक अजयकुमार बन्सल, अपर पोलिस अधिक्षक आयुष नोपाणी, कालिका स्टिलचे धनश्याम गोयल, महापालिका आयुक्त संतोष खांडेकर, भास्कर दानवे यांची उपस्थिती होती तसेच पोलीस अधीक्षक कार्यालय मध्ये स्क्रीन विभागातील पोलीस कर्मचारी अधिकारी .राजू वाघमारे.महिला. पोलीस.नागरे.बनकर. काटकर. यांच्यासह नियंत्रण. कक्ष विभागातील पोलीस कर्मचारी होते.

### व्हीएमडी नर्सिंग महाविद्यालयात

घेण्यात आले. या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेच्या संचालक आणि संचालक मंडळातील सदस्य उपस्थित होते, ज्यामध्ये सौ. संध्या दीपकराव देशमुख, कोषाध्यक्ष गणेश देशमुख, अनंतराव देशमुख, बालाजी जगतकर, सतीश सानप, प्रदीप देशमुख, दिनेश देशमुख, संदीप देशमुख यांचा समावेश होता. महाविद्यालयाचे व्यवस्थापक प्रमोद पतकी, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. उत्साहवर्धक वातावरणात हा कार्यक्रम पार पडला.

cmyk

दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

रविवार दि.१७ ऑगस्ट २०२५



## विधानपरिषद सभापती राम शिंदे यांचा दौरा कार्यक्रम

बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्र विधान परिषद सभापती राम शिंदे बीड जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहेत, त्यांचा दौरा कार्यक्रम पुढीलप्रमाणे असणार आहे. दिनांक १७ ऑगस्ट रोजी सकाळी ७.३० वाजता शासकीय विश्रामगृह अहिल्यानगर येथून शासकीय वाहनाने पिंप्री (घुमरी) ता. आष्टी, जि. बीड कडे प्रयाण. सकाळी ८.३० वा पिंप्री (घुमरी) ता. आष्टी, जि. बीड येथे आगमन व श्रीमती अश्विनी देवराव परकाळे यांची यु.पी.एस.सी. मध्ये पदी निवड झाल्याबद्दल पिंप्री घुमरी ग्रामस्थांच्या वतीने आयोजित भव्य नागरी सत्कार सोहळ्यास उपस्थिती. सकाळी ९.३० वा. पिंप्री (घुमरी), ता.आष्टी, जि.बीड येथून शासकीय वाहनाने ता.कर्जत, जि.अहिल्यानगरकडे प्रयाण.

# स्वातंत्र्य दिनानिमित्त जालन्यात पालकमंत्री ना. पंकजा मुंडे यांच्या हस्ते ध्वजारोहण

## जालना जिल्हा विकासात पहिल्या क्रमांकावर आणण्यासाठी कटीबध्द

जालना । प्रतिनिधी

जालना शहर औद्योगिक शहर म्हणून झपाट्याने विकसित होत आहे. यापुढेही जालना जिल्ह्यात शासनाकडून विविध विकासात्मक कामे करुन आपल्याला विकास साधावयाचा आहे. तरी पालकमंत्री या नात्याने जालना जिल्ह्याच्या सर्वांगिण विकासासाठी कटीबध्द राहील, असे प्रतिपादन राज्याच्या पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसंवर्धन मंत्री तथा जालना जिल्ह्याच्या पालकमंत्री पंकजा मुंडे यांनी केले. जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात भारतीय स्वातंत्र्य दिनानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या ध्वजारोहणाचा मुख्य शासकीय समारंभ पार पडला. यावेळी त्या बोलत होत्या. यावेळी जिल्हाधिकारी आशिमा मित्तल, जि.प.मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नू पी.एम., पोलिस अधिक्षक अजयकुमार बन्सल यांची प्रमुख उपस्थिती होती. तर यावेळी आमदार अर्जुन खोतकर, आमदार नारायण कुचे, आमदार हिकमत उढाण यांची उपस्थिती होती. पालकमंत्री पंकजाताई मुंडे म्हणाल्या की, जिल्ह्यात नूकत्याच पार पडलेल्या महसूल सप्ताहाच्या माध्यमातून जिल्ह्यात विविध उपक्रम राबविण्यात आले. जिल्हाभरात छत्रपती



शिवाजी महाराज महाराजस्व अभियान, वृक्ष लागवड, विविध दाखल्याचे वितरण, डिबीटीद्वारे लाभ, शासकीय जमिनीवरील अतिक्रमणे निष्कासित करणे यासारखी अनेक उल्लेखनीय कामे करण्यात आली आहे. पाणंद रस्ते, शेतरस्ते मोकळे करणे अभियानातंर्गत जालना जिल्ह्यात एकुण १८० रस्ते ज्यांची लांबी २८८.२५ कि.मी.अतिक्रमणमुक्त करण्यात आले असून नोंद अधिकार अभिलेखात घेण्याची कार्यवाही सुरु आहे. ग्रामीण भागात स्थानिक स्वराज्य संस्था म्हणुन काम करणाऱ्या ग्रामपंचायत, पंचायत समिती व जिल्हा परिषद यांना प्रोत्साहित करुन त्यांची कार्यक्षमता वाढविण्यासाठी सन २०२५-२६ पासून तालूका, जिल्हा, महसूल विभाग व राज्य स्तरांवर प्रोत्साहन देण्यासाठी 'मुख्यमंत्री समृध्द पंचायत राज अभियान' राबविण्यात येणार आहे.

जालना जिल्हा परिषदेने पर्यावरणपुरक आणि सामाजिक हितासाठी तसेच पर्यावरणाचे संवर्धन व्हावे यासाठी जिल्हा परिषद परिसर स्वच्छ व सुंदर राहावा याकरीता 'झिरो प्लास्टिक मोहिम' राबवून प्लास्टिकच्या वापरावर पूर्णपणे बंदी घातली आहे. याचप्रमाणे संपूर्ण जिल्ह्यात देखील ही मोहिम राबविण्याचे प्रशासनाचा मानस आहे. तरी या मोहिमेला नागरिकांनी सहकार्य करावे. असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

जालना जिल्ह्यातील समग्र शिक्षा योजने अंतर्गत वर्ष २०२५-२६ मध्ये १५ जुन रोजी शाळा सुरु होण्याच्या पहिल्याच दिवशी जिल्ह्यातील एकुण १ लाख ३८ हजार २१ विद्यार्थ्यांना मोफत गणवेशाचे वितरण करण्यात आले आहे. जिल्हा परिषद निवासी क्रीडा प्रबोधिनीतील ५७ विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय स्तरावर सहभाग नोंदविला आहे. त्यापैकी १३ विद्यार्थ्यांनी सुवर्ण तर २ विद्यार्थ्यांनी रौप्य आणि २ विद्यार्थ्यांनी कास्य राष्ट्रीयस्तरावरील पदके मिळवली आहेत. जिल्हा क्रिडा संकूलामध्ये अद्ययावत क्रिडा सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहेत. यामध्ये अंतर्गत टेनिस कोर्ट, सिंथेटीक बास्केटबॉल, आर्टिफिशियल क्रिकेट टर्फ, सिंथेटीक स्केटींग रिंग, व्हॉलीबॉल मैदान, कबड्डी मैदान, खोखो मैदान, जिम हॉल, , संरक्षक भिंत तसेच अंतर्गत रस्ते व ड्रेनेज लाईन आदि कामे जिल्हा क्रीडा संकुल समितीकडून विकसित करण्यात आली आहेत. तर ४०० मिटर सिंथेटीक ट्रॅक व नॅचरल फुटबॉल मैदानाचे काम प्रगतीपथावर आहे. तसेच विद्यार्थ्यांच्या अभ्यासामध्ये स्पर्धा व सराव करण्याची वृत्ती निर्माण व्हावी या उद्देशाने जालना जिल्हाधिकारी यांच्या 'महादीप' या महत्वाकांक्षी योजनेतून श्रीहरी कोटा येथील इस्रो अंतराळ विज्ञान केंद्रातील संग्रहालयात जिल्ह्यातील ५० विद्यार्थ्यांची स्पर्धात्मक परिक्षा घेवून विमानाद्वारे सहल नेण्यात आली. स्व.गोपिनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह योजनेअंतर्गत अपघाताने मृत्यू झालेल्या व अपंगत्व आलेल्या एकुण २१० शेतकऱ्यांच्या वारसदारास ४.२५ कोटी रुपये रक्कम सानुग्रह अनुदान मंजूर केले आहे. नानाजी देशमुख कृषी संजिवनी प्रकल्प टप्पा -२ अंतर्गत जालना जिल्ह्यामध्ये १७७ गावांची निवड करण्यात आली असून ग्राम कृषि विकास समिती स्थापन करण्यात आल्या आहेत. प्रधानमंत्री सुक्ष्म अन्न प्रक्रिया योजनेअंतर्गत ५३१ लाभार्थ्यांना २६.६४ कोटी रुपये कर्जाचे वितरण तर ११.३० कोटी रुपयांचे अनुदान वाटप करण्यात आले आहे. भारतीय स्वातंत्र्य दिनानिमित्त देशभक्तीचे वातावरण निर्माण व्हावे, तिरंगामय वातावरण निर्माण करण्यासाठी जिल्ह्यातील सर्व नागरिकांनी १३ ते १५ ऑगस्ट दरम्यान हर घर तिरंगा अभियान राबविण्यात आले. असेही त्यांनी यावेळी सांगितले. भाषणानंतर पालकमंत्री पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते गौरवास्पद कामगिरी केलेल्या अधिकारी, कर्मचारी, तसेच विर पत्नी, विर पिता यांच्यासह १०० दिवसांच्या कार्यक्रमात अव्वल आलेल्या कार्यालयाचाही यथोचित सन्मान करण्यात आला. उपस्थित लोकप्रतिनिधी, मान्यवर व नागरिकांची पालकमंत्री श्रीमती मुंडे यांनी भेट घेतली. प्रारंभी ध्वजारोहण झाल्यानंतर पोलीस दलाच्यावतीने राष्ट्रगीत व राज्यगीत सादर करण्यात आले व राष्ट्रध्वजास सलामी देण्यात आली.

## गंगाभारती पतसंस्थेच्या अपहार प्रकरणी ठेवीदारांची अजित दादांकडे धाव ; ठेवीदारांना दिलासा



बीड । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील गंगाभारती महाराज ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था येथे झालेल्या कोटच्यवधींच्या अपहार प्रकरणामुळे ठेवीदारांच्या हातचे पैसे अडकले असून, ठेवीदारांमध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला आहे. संस्थेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव, व्यवस्थापक व संचालक मंडळ मोकाट फिरत असून, संबंधितांवर गुन्हा दाखल असला तरी दोन वर्षांपासून ते फरार आहेत. यामुळे बीड पोलिसांच्या निष्क्रियतेवरही प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

१३ मार्च २०२४ रोजी मांजरसुंबा पिंपळवाडी शाखेत अपहार प्रकरणी नेकनुर पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजिस्टर नं. ००४५/२०२४ दाखल करण्यात आला होता. करचुंडी, लिंबागणेश, मांजरसुंबा, चौसाळा व बीड पिंपळवाडी या शाखांतील ठेवीदारांचे सुमारे ५ ते ६ कोटी रुपये अडकलेले आहेत. या गंभीर प्रकरणात ठेवीदारांचे हक्क अबाधित राहावेत यासाठी युवा ग्रामीण पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष हरिओम क्षीरसागर यांच्या नेतृत्वाखाली ठेवीदारांनी स्वातंत्र्य दिनादिवशी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलनाचा इशारा दिला होता. यानंतर राज्याचे उपमुख्यमंत्री व बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित दादा पवार यांची ठेवीदारांसह हरिओम क्षीरसागर यांनी भेट घेऊन लेखी निवेदन सादर केले. निवेदनातील मुख्य मागण्या : गुन्हा दाखल असलेल्या सर्व आरोपींना तात्काळ अटक करावी. संचालक व शाखाधिकारी यांच्यावरही गुन्हे दाखल करावेत. ठेवीदारांचे पैसे परत करण्याची तातडीने कार्यवाही करावी. प्रशासकांनी निष्क्रीय राहू नये; प्रभावी कारवाई करणे आवश्यक. शासकीय लेखा परीक्षकांनी संस्थेच्या सर्व शाखांचा लेखापरीक्षण अहवाल तात्काळ तयार करून निबंधक कार्यालयात दाखल करावा. या वेळी अजित दादांनी ठेवीदारांच्या भावना लक्षात घेऊन त्वरित कार्यवाहीचे आश्वासन दिले. तसेच ठेवीदारांच्या हक्कासाठी सरकार सर्वतोपरी प्रयत्न करेल, असा दिलासा त्यांनी दिला.

## मंगलम फुड अँड पार्क बीडकरांसाठी विरंगुळा स्पॉट-राजेंद्र मस्के

बीड । प्रतिनिधी

आज पालवण चहऱ्हाटा रोड, पालवण,येथे श्री विष्णू तात्या मस्के यांच्या मंगलम फुड अॅड पार्क नवीन उद्योगाचा शुभारंभ राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के,इंजि. अजय अर्जुनराव पाटील,इंजि. अक्षय शिवाजीराव घोडके, प्रा. नारायणराव मस्के, सीए जाधव, बळीराम गवते, रावसाहेब मस्के आदी मान्यवरांच्या उपस्थितीत झाला.

बीड शहरात मुलं बाळ सहपरिवार निवांत खेळ मनोरंजना साठी उद्यानांची उणीव आहे. आधुनिक तंत्रज्ञान युगात मोबाईल मुळे माणसाच्या मुठीत जग आलं.परंतु माणसा माणसात दरी वाढली. मोठ्यांसह लहान मुले पूर्णतः मोबाईलच्या गर्तेतअडकले.सातत्याने मोबाईलच्या वापरा मुळे मुलांच्या आरोग्यावर परिणाम होऊ लागला. नवी पिढी खेळ गप्पा गोष्टी निसर्ग या पासून दूर चालली आहेत. आरोग्य आणि मानसिकते साठी हि बाब गंभीर ठरू शकते. लहान मुलांच्या बुद्धीवर शालेय अभ्यासक्रमांचा मोठा ताण आहे . कुटुंबाची



जबाबदारी पेलताना महिला वर्गावर ही कायम तणावाची स्थिती असते. तणावग्रस्त मानसिकतेतून मुक्त होण्यासाठी निसर्गरम्य वातावरणात मुलांना बागडण्या साठी सर्व सोयी नियुक्त खुलं मैदान पाहिजे. ही सुविधा विष्णू मस्के यांनी बीड शहरा नजीक फुड अँड पार्क सुरू करून खऱ्या अर्थाने बीड करांची उणीव भरून काढली. मंगलम फूड अँड पार्क बीडकरांचा विरंगुळा स्पॉट ठरेल. अशा शुभेच्छा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी दिल्या.

## एड्स रोगाचे उच्चाटन करण्यासाठी व्यसनमुक्तीचा प्रसार करा-सोमनाथ घाडगे



पाटोदा। प्रतिनिधी

पाटोदा येथील जय भवानी जय भवानी कला व विज्ञान महाविद्यालय पाटोदा येथे राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने एड्स जनजागृती मोहिमेअंतर्गत जिल्हा नियंत्रण कक्षाच्या वतीने आज विद्यार्थ्यांना प्राध्यापकांना व्यसनमुक्तीची शपथ देण्यात आली मी या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून प्राचार्य डॉक्टर विश्वासराव कदम अध्यक्ष प्राचार्य सोमनाथ घाडगे सर कार्यक्रमाधिकारी प्राध्यापक बापू घोक्षे सर प्राध्यापक पापाजी चव्हाण डॉक्टर वंदन जाधव प्रमुख पाहुणे उपस्थित होते स्वातंत्र्य दिनाचा उत्सव साजरा करताना विद्यार्थ्यांना व्यसनमुक्तीचा प्रतिज्ञा देऊन निशाणी आरोग्य कशी घातक आहे याविषयी मार्गदर्शन करण्यात आले कार्यक्र माचा विद्याल यातील ती कर्मचारी प्राध्यापक उपस्थित होते कार्यक्रमाचे संचालक प्राध्यापक लोखंडी बीबी यांनी केले आभार प्राध्यापक रामकृष्ण प्रधान यांनी मानले हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रा शिवाजीराव शिवाजीराव काकडे प्राध्यापक नारायण फुने यांनी सहकार्य केले

## जयभवानी महाविद्यालयामध्ये भितीपत्रकाचे प्रकाशन

पाटोदा । प्रतिनिधी

येथील जयभवानी शिक्षण प्रसारक मंडळाचे कला व विज्ञान महाविद्यालयामध्ये भारतीय स्वातंत्र्याचा वर्धापन दिन तीन दिवसीय उत्साहात दुसऱ्या दिवशीचे ध्वजारोहण जेष्ठ पत्रकार मा.श्री.पोपटराव कोल्हे यांच्या शुभहस्ते झाले.या प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणुन प्राचार्य डॉ.विश्वास कदम, अध्यक्षस्थानी प्र.प्राचार्य प्रा.सोमनाथ घाडगे आदि मान्यवर उपस्थित होते. या औचित्याने महाविद्यालयातील समाजशास्त्र विभागाने अभिजात परंपरा या विभागाच्या भितीपत्रकाचे प्रकाशन केले. यावेळी उद्घाटक म्हणून मार्गदर्शक प्राचार्य डॉ. विश्वास कदम हे उपस्थित होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ पत्रकार पोपटराव कोल्हे यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य प्रा. सोमनाथजी घाडगे उपस्थित होते. व्यासपीठावर अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक प्रा. विनोद किर्दक,प्रा.डॉ. रामकृष्ण प्रधान, प्रा. गोपाळ धांडे हे आवर्जून उपस्थित होते. सदरील भित्तिपत्रक तयार करण्याचे कार्य श्रीकृष्ण पवार (बी.ए. द्वितीय वर्ष), कृष्णा पठाडे (बी.ए. प्रथम वर्ष), कु शितल राजपुरे (बी.एससी. द्वितीय वर्ष) व कु.दर्शना सांगळे (बी.ए. प्रथम वर्ष) या समाजशास्त्र विभागातील विद्यार्थी-विद्यार्थिनींनी परिश्रम घेतले. प्रारंभी या प्रकाशन कार्यक्रमाचे प्रस्ताविक विभाग प्रमुख प्रा.डॉ.सुनिल जाधव यांनी केले.


## जालन्यात रंगला गोर बंजारा तिज महोत्स

### ना.पंकजाताई मुंडे यांची उपस्थिती ठरली आकर्षणाचा केंद्रबिंदू

जालना । प्रतिनिधी

सामाजिक एकतेचा संदेश देणाऱ्या गोर बंजारा समाजाच्या तिज महोत्सव शहरातील सोरटी नगर येथे आजपासून सुरू झाला. पालकमंत्री पंकजाताई मुंडे यांनी सकाळी विशेष हजेरी लावल्याने या महोत्सवाला अधिक रंगत आली. पारंपरिक वेषभूषेत सहभागी झालेल्या बंजारा महिलांसोबत पंकजाताई मुंडे याठिकाणी रमल्या, त्यामुळे त्यांची उपस्थिती आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरली.

आमदार राजेश राठोड यांच्या विशेष आमंत्रणावरून जिल्ह्याच्या पालकमंत्री पंकजा मुंडे यांनी सोरटी नगर, अंबड चौफुली येथे या उत्सवाला भेट दिली. पारंपरिक वाद्यांच्या गजरात आणि जल्लोषात त्यांचे स्वागत करण्यात आले.पारंपरिक वेशभूषा,



पारंपरिक खाद्यपदार्थ आणि रंगीबेरंगी झांजपथकांनी संपूर्ण वातावरण भारावून गेले होते.बंजारा महिलांचे पारंपरिक लेंगा-चोळी परिधान करत साजरे केलेले तिज नृत्य यामध्ये काहीकाळ पंकजाताई मुंडे रममाण झाल्या. पंकजाताईंनी महोत्सवात सहभाग घेतल्यावर उपस्थित बंजारा बांधवांशी आत्मियतेने संवाद साधला. यामुळे बंजारा समाज बांधवांचा उत्साह द्विगुणित झाला होता.त्यांनी बंजारा समाजाच्या सांस्कृतिक वारशाचे आणि एकतेचे कौतुक केले. गोर बंजारा समाजाच्या संस्कृतीतील ही तिज परंपरा ही आपली अस्मिता आहे. समाजाच्या प्रेमाने आणि उत्साहाने मन आनंदून गेले अशी भावना यावेळी पंकजाताई मुंडे यांनी व्यक्त केली.यावेळी पारंपरिक पामडी देवून त्यांचा सत्कार करण्यात आला.

# मनोज जरांगे पाटलांचा मराठा आरक्षण लढा यशस्वी होणार

## २९ ऑगस्ट चलो मुंबई मराठा आरक्षण लढ्यात सहभागी व्हा-राजेंद्र मस्के

बीड । प्रतिनिधी

सूर्याचीवाडी ता.बीड येथे सालाबादाप्रमाणे याही वर्षी अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन केले होते. श्री क्षेत्र बेलेश्वरचे हभप तुकाराम महाराज भारती यांच्या कीर्तनाने सांगता झाली. यावेळी राष्ट्रवादी शरद पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के उपस्थित होते. पंचक्रोशीतील बहुसंख्येने समाज सहभागी झाला होता.यावेळी उपस्थितांना संबोधित करताना राजेंद्र मस्के म्हणाले की,राज्यातील गोर गरीब मराठ्यांना आरक्षण मिळावे यासाठी गेली दोन वर्षापासून संघर्ष योद्धा मनोज दादा जरांगे पाटील हे सरकारशी संघर्ष करत आहेत. परंतु सरकार सकारात्मक विचार न करता वेळकाढूपणा करत आहे. प्रत्येक वेळी शिष्टमंडळ पाठवून जरांगे पाटलांच्या उपोषणाला खोटी आश्वासन



देवून दिशाभूल केली जाते.

न्याय हक्कासाठी एक पाऊल मागे घेऊन परत मनोज दादांच्या नेतृत्वाखाली मोठी झेप घ्यायची आहे. मराठा समाजाला सरसकट ओबीसी मधून आरक्षण मिळावे याकरिता २९ ऑगस्ट रोजी मुंबईत आंदोलन होत आहे. जरांगे पाटलांच्या आंदोलना मुळे लाखो कुणबी प्रमाणपत्र मिळाले. या प्रमाणपत्राचा फायदा मराठा समाजातील मुला-मुलींना शिक्षण व नोकऱ्यांमध्ये होताना दिसतो आहे. स्पर्धेच्या युगात मराठा समाजाचे मुलं मुली शासकीय सेवेत नोकरीला लागत आहेत. मराठा समाजाला प्रगतीच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी लढा चालू आहे. शेतकरी शेतमजूर सर्वांनी आपली कामे बाजूला ठेवून मुला मुलींच्या भवितव्यासाठी २९ ऑगस्ट रोजी जरांगे पाटलांच्या नेतृत्वात होत असलेल्या आंदोलनात मराठा समाजाने मोठ्या संख्येने सहभागी व्हावे. असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी केले आहे.

## जय भवानी महाविद्यालयात वृक्षाला राखी बांधून पर्यावरणाचे संवर्धन



पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा येथील जय भवानी कला व विज्ञान महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने वृक्ष संवर्धनासाठी व पर्यावरण संवर्धनासाठी विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाच्या परिसरातील वृक्षांना रक्षाबंधन पर्यावरण संरक्षणाचा संदेश दिला या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून मार्गदर्शक प्राचार्य डॉक्टर विश्वास कदम तर अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य सोमनाथ घाडगे सर दैनिक चंपावतीचे तालुका प्रतिनिधी माननीय सोमनाथ कोल्हे साहेब प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते मान्यवरांच्या हस्ते व राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या स्वयंसेवकांनी महाविद्यालयातील परास परिसरातील पक्षांना व महाविद्यालयातील स्वयंसेवकांना आराख्य बांधून सामाजिक समतेचा व पर्यावरणाचा संधी दिली हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कार्यक्रम अधिकारी डॉ बापू घोक्षे कार्यक्रमाधिकारी अधिकारी डॉक्टर लोखंडे बी बी मला तर ग्रंथपाल सौ रकटे मॅडम प्राध्यापक पापाजी चव्हाण प्राध्यापक डॉ वंदन जाधव सर प्राध्यापक डॉक्टर शिवाजीराव काकडे सर कराटे प्रशिक्षक व विद्यार्थी यांनी परिश्रम घेतले

cmyk

# आता पिक पाहणी होणार झटपट; अपडेटेड व्हर्जनचे अ‍ॅप वापरल्यास फायदा

पुणे : राज्य सरकारच्या ई-पीक पाहणी योजनेंतर्गत खरीप हंगामातील पीक नोंदणीला शेतकऱ्यांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून, अंतिम टप्प्यात शेतकरी वर्गाची धावपळ सुरू झाली आहे. १ ऑगस्टपासून सुरू झालेली ही प्रक्रिया १४ सप्टेंबरपर्यंत चालणार आहे. शेतकऱ्यांनी आपल्या शेतातील पिकांची माहिती मोबाइल अ‍ॅप किंवा पोर्टलद्वारे स्वतः नोंदवणे बंधनकारक आहे. या योजनेत शेतकरी स्वतः किंवा सहायकांच्या मदतीने पिकांची नोंद सात-बारा उताऱ्यावर ऑनलाइन करू शकतात. त्यासाठी आधार क्रमांकाशी लिंक असलेला मोबाइल नंबर आवश्यक आहे. पिकांच्या नोंदीसोबत बांधावरील आंबा, पिंपळ, कडूनिंब आदी झाडांची संख्या व प्रकार नोंदवणे आणि त्यांचे फोटो अपलोड करणे बंधनकारक आहे. याशिवाय शेतातील चालू पड किंवा कायम पड क्षेत्राची नोंदही यात करता येते. यंदा संबंधित गटाच्या हद्दीपासून ५० मीटरच्या आतील पिकांचे दोन फोटो अपलोड करणे अनिवार्य केले आहे. नोंदणीदरम्यान काही त्रुटी झाल्यास ४८ तासांच्या आत अ‍ॅपद्वारे दुरुस्ती करण्याची सुविधा उपलब्ध आहे. प्रशासनाकडून शेतकऱ्यांना वेळेत नोंदणी पूर्ण करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. अंतिम मुदतीनंतर नोंदणी झाल्यास पीकविमा, अनुदान आणि शासकीय योजनांच्या लाभात अडथळे येऊ शकतात, असा इशारा महसूल विभागाने दिला आहे.



काही जिल्ह्यांमध्ये यशस्वी प्रयोगानंतर, यंदा हा प्रकल्प राज्यातील सर्व जिल्ह्यांत लागू करण्यात आला आहे. प्रशासनाने सर्व शेतकऱ्यांना आपली पीक नोंदणी डिजिटल पद्धतीने करण्याचे आवाहन केले आहे. नवीन आवृत्तीमध्ये जीपीएस लोकेशन ट्रॅकिंग, ५० मीटरच्या परिघातील फोटो व्हेरिफिकेशन, तसेच ऑफलाइन मोडमध्ये डेटा सेव्ह करण्याची सुविधा उपलब्ध करण्यात आली आहे. शेतात पिकाबरोबर बांधावर लावलेली झाडे किंवा पड क्षेत्र असल्यास त्याची नोंद करणे बंधनकारक आहे. ही माहिती कृषी विभागाला शेतजमिनीच्या सर्वांगीण वापराचे चित्र दाखवेल.

अ‍ॅप डाउनलोड आणि लॉगिन :गुगल पे-स्टोअरवरून ई-पीक पाहणी डीसीएस ४.०.० हे अपडेटेड व्हर्जनचे अ‍ॅप डाउनलोड करावे. त्यानंतर आधार आणि मोबाइल नंबर वापरून लॉगिन करावे. लॉगिन झाल्यावर शेतकऱ्यांनी त्यांच्या नावावर असलेल्या जमिनीचा गट क्रमांक निवडावा. पिकांची माहिती जसे की पीक क्षेत्र, पेरणीची तारीख आदी काळजीपूर्वक भरा.

फोटो अपलोड करणे :अ‍ॅपमध्ये आता ५० मीटरच्या आतून पिकांचा फोटो काढणे बंधनकारक आहे, जेणेकरून पिकाची अचूक माहिती मिळेल. एकदा माहिती जतन (सेव्ह) केल्यावर, ती आपोआप सातबारावर नोंदवली जाते. यामुळे शेतातील पिकांची नोंदणी अधिकृतपणे होते.

दुरुस्ती करण्याची सोय : नोंदणी करताना काही चूक झाल्यास, शेतकरी ४८ तासांच्या आत अ‍ॅपमधून ती दुरुस्त करू शकतात.

बांधावरील झाडे आणि पडीक क्षेत्राची नोंद : या अ‍ॅपमुळे बांधावरील झाडे आणि पडीक क्षेत्राची नोंदही करता येते. त्यामुळे जमिनीच्या संपूर्ण क्षेत्राची अचूक माहिती मिळते.

नकाशावर स्थान निश्चिती : अ‍ॅपमध्ये नकाशावर शेताच्या स्थानाची निश्चिती करण्याची सोय असल्याने अचूकता वाढते. याची मदत घेत शेतकऱ्यांनी पीक नोंदणी करून घ्यावी.

डिजिटल क्रॉप सर्व्हे अ‍ॅपद्वारे ई-पीक पाहणी :यावर्षी ई-पीक पाहणी डीसीएस मोबाइल अ‍ॅप गुगल प्ले स्टोअरवर ४.०.० व्हर्जनमध्ये उपलब्ध करून दिले आहे. शेतकऱ्यांना अ‍ॅप डाउनलोड करून ऑनलाइन पीकपेरा नोंद करावी. शेतकऱ्यांच्या मदतीसाठी सहायकांची नेमणूक : शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी प्रत्येक गावात सहायक नेमले जाणार आहेत. हे सहायक अ‍ॅपचा वापर, पिकांची नोंदणी आणि फोटो अपलोड करण्यास मार्गदर्शन करतील.

## पौष्टिक भाज्यांबाबत लोकांना जागरुक करण्यासाठी रानभाजी महोत्सव



आजी आणि तिची रानभाजी ही सध्याच्या जीवनापासून दूरदूर जाताना दिसत आहे. अनुभवाची गोष्ट सांगून नातवांचे जीवन समृद्ध करणारी घरातली आजी, तिचा औषधी गुणकारी बटवा आणि मानवी आरोग्य समृद्ध करणारी तिची रानभाजी या नव्या पिढीपासून काळाच्या ओघात हरवत जात आहे.

महाराष्ट्र शासन कृषी विभाग, प्रकल्प संचालक आत्मा यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यात विविध ठिकाणी जिल्हास्तरीय रानभाजी महोत्सव, रानभाजी पाककला स्पर्धा आयोजित करण्यात येते. कोणत्याही लागवडीशिवाय, कीटकनाशकांच्या फवारणीशिवाय उगवलेल्या, वाढलेल्या रानभाज्यांमध्ये आरोग्यासाठी पौष्टिक गुणधर्म असतात. विशेषतः भारंगी, दिंडा, कुई, केना, कुडाच्या शेंगा, आघाडा, टाकळा, आंबाडी, पानाचा ओवा, कपाळफोडी, शेवगा, पिंपळ, बांबू, सुरण, करटोली, मटारू, माठ, चिवळ, घोळभाजी, भुई आवळा, कवठ, केळफूल या रानभाज्यांमध्ये अँटी ऑक्साईड, अ, ब, क, इ ही जीवनसत्त्वे, खनिजे, प्रथिने व तंतुमय पदार्थ मोठ्या प्रमाणावर आहेत. या भाज्यांमध्ये उष्मांक मूल्यही कमी असल्याने मधुमेहींसाठी वरदान आहेत. काळाच्या ओघात माहितीअभावी रानभाज्या खाण्याचे प्रमाण कमी होत आहे.

नागरिकांना त्याचे महत्त्व कळावे आणि खेडोपाडी राहणाऱ्या शेतकऱ्याचा आर्थिक फायदा व्हावा, यासाठी जिल्हास्तरावर व तालुकास्तरावर रानभाजी महोत्सव विविध जिल्ह्यात राबविण्यात येत आहेत.

## शेळ्या-मेंढ्यांना होणाऱ्या फुट रॉट आजाराची लक्षणे व उपचार


फुट रॉट हा शेळ्यांमध्ये होणारा अत्यंत संसर्गजन्य आजार आहे. जो त्यांच्या खुरांवर परिणाम करतो. फुट रॉट या आजारामध्ये शेळ्या आणि मेंढ्यांचे पाय कुजतात. या आजारामध्ये जनावराचे वजन कमी होवुन उत्पादन कमी होते, आणि योग्य उपचार न मिळाल्यास जनावरांचा अकाली मृत्यू होतो.

फुट रॉट हा शेळ्यांमध्ये होणारा अत्यंत संसर्गजन्य आजार आहे. जो त्यांच्या खुरांवर परिणाम करतो. फुट रॉट या आजारामध्ये शेळ्या आणि मेंढ्यांचे पाय कुजतात. या आजारामध्ये जनावराचे वजन कमी होवुन उत्पादन कमी होते, आणि योग्य उपचार न मिळाल्यास जनावरांचा अकाली मृत्यू होतो.

या आजाराची लक्षणे :

पाय कुजलेल्या शेळ्यांमध्ये वेदनेमुळे अस्वस्थता जाणवेल, प्रभावित खुर सुजतात आणि स्पर्शास कोमल लागतात. गंभीर प्रकरणांमध्ये सूज पाय वर वाढू शकते ज्यामुळे जनावरे लंगडत चालु लागतात. फूटरोटमुळे खुरांमधुन खराब वास येतो, ज्यामुळे प्रभावित खुरातील बॅक्टेरिया वाढीस लागतात.

खुरांना तडे गेलेले किंवा खुर खराब झालेले दिसू शकतात आणि त्याचे पृष्ठभाग खडबडीत असू शकते.



फूटरोटमुळे प्रभावित खुरातून स्त्राव होऊ शकतो, जे संसर्गाचे महत्वाचे लक्षण असू शकते. पाय कुजलेल्या शेळ्या उभे राहण्यास किंवा चालण्यास अनिच्छा दाखवत असतील, तर वेदना तीव्र असू शकतात. संसर्ग पसरण्यापासून आणि शेळ्यांमध्ये अधिक गंभीर आरोग्य समस्या निर्माण होण्यापासून रोखण्यासाठी शक्य तितक्या लवकर पाय कुजण्याचे निदान आणि उपचार करणे महत्वाचे आहे.

या आजारावर नियंत्रण :पशुवैद्यांच्या सल्ला घेवुन वेळोवेळी जनावरांची नखे छाटावीत.

कळपात समाविष्ट करण्यापुर्वी नव्या जनावरांना फूटरॉट आणि इतर जुनाट आजारा नसल्याची खात्री करुन घ्यावी. जनावरांच्या वाहतुक वाहनांचे निर्जंतुकीकरण करणे महत्त्वाचे आहे. फूटरॉट संसर्गचा धोका कमी होण्यासाठी दर ५ ते ७ दिवसांनी १० टक्के झिंक सल्फेटच्या पण्यामध्ये मेंढ्यांना १५ मिनिटांपर्यंत उभे राहण्यास भाग पाडावे. बाधित जनावरे बरी होईपर्यंत कोरड्या जागेत ठेवावीत, कारण ओलाव्यामुळे हा संसर्ग वाढतो. त्याचबरोबर पशुवैद्यांकडुन योग्य तो सल्ला घ्यावा.

## द्राक्ष बाग लावण्याआधी या गोष्टींची घ्या काळजी

सध्या तरुणाईचा ओढा पाहिला तर बऱ्यापैकी आता शेतीकडे वळताना दिसत आहे. परंतु परंपरागत पद्धत आणि पिके आहेत, त्यांना तिलांजली देऊन आधुनिक पद्धतीने शेती करून नवनवीन पिके घेण्याकडे त्यांचा कल आहे. जास्तकरून तरुणाई फळबाग लागवडीकडे मोठ्या प्रमाणावर वळत आहे. द्राक्ष बागाचा विचार केला तर याच्या लागवडीसाठी काही महत्त्वपूर्ण गोष्टींची काळजी घ्यावी लागते

या गोष्टींचा अभ्यास महत्त्वाचा :द्राक्षबागांचे लागवड केली तर पहिले पीक साधारणतः दीड वर्षात हातात येते. एकदा द्राक्षाची लागवड केली तर कमीत कमी दहा वर्षांपर्यंत एक चांगला आर्थिक उत्पन्नाचा स्त्रोत मिळणे शक्य आहे. द्राक्ष बागेत वर्षभर वेगवेगळ्या पद्धतीचे कामे असतात त्यामुळे मजुरांच्या हाताला देखील वर्षभर काम उपलब्ध होते. आपल्या जवळ उपलब्ध असलेले पाणी, जमीन आणि मनुष्यबळ यांचा चांगल्या पद्धतीने मेळ घालता येतो. सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे द्राक्षबाग हे एक प्रतिष्ठितपणाचे तसेच अभ्यासूपणाचे द्योतक आहे.

किती क्षेत्रात करावी लागवड : हा मुद्दा सगळ्यात महत्त्वाचा असून यामध्ये द्राक्ष बाग लागवड करण्याआधी आपली एकूण जमीन किती आहे? ती बागायत आहे का? इत्यादी गोष्टींचा विचार करणे खूप गरजेचे आहे. यामध्ये सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे द्राक्ष बागेची लागवड करताना ३४/३७/४२/४६ गुंठे असे अडनिड क्षेत्र निवडू



नका.

द्राक्ष बाग नेमकी कोणत्या ठिकाणी लावावी :समजा बऱ्याचदा जमिन एका ठिकाणी नसते तर ते दोन ते तीन ठिकाणी असते तर अशावेळी एकाच कुठल्यातरी ठिकाणांची निवड करणे अपेक्षित असते. जमिनीची निवड करताना त्या जमिनीचे क्षेत्र, या जमिनीचा सुपीकता व त्या जमिनीला असलेल्या पाणीपुरवठा साधनांची सोय व वाहतुकीसाठी रस्ता इत्यादी बाबींचा विचार करणे खूप गरजेचे आहे.

द्राक्ष बाग लावण्याची वेळ :द्राक्ष बागेची लागवड कधीही करू शकतात. परंतु काही अपवाद वगळता मध्य ऑक्टोबर ते जानेवारीच्या मध्यात लागवड करू शकता. जर डिसेंबर, जानेवारीत लागवड केली तर अधिक यशस्वी होते व पहिले पीक १५ महिन्याच्या आत हातात देऊ शकते.

द्राक्ष जातींची योग्य निवड :काही प्रचलित आहेत त्यामधून निवड करणे उत्तम असते. नवीन द्राक्ष बाग लागवड करताना नवीन, पहिल्यांदा माहीत नसलेली द्राक्ष जात लावू नये. प्रचलित जातींपैकी थॉमसन सीडलेस, सोनाका, माणिक चमन, शरद सीडलेस इत्यादी जातींची निवड महत्त्वाची ठरते.

लागवड किती अंतरावर करावी :द्राक्षांची लागवड करताना दोन ओळीत आठ फूट व दोन वेलीत सहा फूट अंतर असणे गरजेचे आहे. रूट स्टॉक वापरायचा असेल तर दोन ओळींत बारा फूट आणि दोन वेलीत ८ फूट अंतर ठेवावे.

लागवड चर पद्धतीन केल्यास ठरते फायदेशीर :द्राक्ष लागवडीसाठी खड्डे यापेक्षा चरांची निवड करणे फायद्याचे असते. चर पद्धती सर्व प्रकारच्या जमिनीसाठी उपयुक्त आहे. चराचे माप घेताना तुमच्या जमिनीचा प्रकार कसा आहे यावर ते सगळे अवलंबून असते. याची रुंदी दोन फूट व खोली अडीच फूट किंवा रुंदी अडीच फूट व खोली दोन फूट ठेवावी. जमिनीच्या उतारानुसार चराची लांबी ठरवणे गरजेचे असते. साधारणतः ती शंभर फुटांपेक्षा जास्त असू नये.

चरात कोणती खते द्यावीत : यासाठी तुमच्या जमिनीचा पोत व तुमच्या जमिनीचा माती परीक्षण अहवाल यांचा विचार करावा. परंतु तरीही खतांचा विचार केला तर चांगले कुजलेले कंपोस्ट खत बारा टन, जिवाणू युक्त सेंद्रिय खते पाचशे ते एक हजार किलो, कडू पेंड पाचशे ते एक हजार किलो व त्यासोबतच हिरवळीचे खत एका एकरातील एका एकरासाठी वापरावे.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१८४१ : जॉन हॅम्प्टन यांनी व्हेनेशियन शैलीच्या खिडकीचे पेटंट केले.
१८८८ : विल्यम बरोज याने बेरजा मारणार्या यंत्राचे पेटंट घेतले.
१९११ : पॅरिसच्या लुव्र या संग्रहालयातुन लिओनार्डो-द-व्हिन्सी याचे 'मोनालिसा' हे जगप्रसिद्ध चित्र चोरीला गेले.
१९१५ : पहिल्या महायुद्धा दरम्यान इटलीने तुर्की विरुद्ध युद्धाची घोषणा केली.
१९३८ : इटली देशांतील शाळांमध्ये ज्यू शिक्षकांवर बंदी घालण्यात आली.
१९६५ : रोमानियाने संविधान स्वीकारले.
१९७२ : वन्यजीव संरक्षण कायद्यास मान्यता मिळाली.
१९८८ : भारत आणि नेपाळ यांच्या सीमेवर आलेल्या तीव्र स्वरूपाच्या भूकंपामुळे हजारो लोक मृत्युमुखी पडले.
१९९१ : लाटव्हियाने स्वत:ला (सोविएत युनियनपासुन) स्वतंत्र घोषित केले.
१९९३ : मंगळाच्या शोधमोहिमेसाठी पाठवण्यात आलेल्या 'मार्स ऑब्झर्व्हर' या यानाचा पृथ्वीशी संपर्क तुटला.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१७६५ : विल्यम (चौथा) इंग्लंडचा राजा (मृत्यू: २० जून १८३७)
१७८९ : ऑगस्टिन कॉशी फ्रेन्च गणितज्ञ (मृत्यू: २३ मे १८५७)
१८७१ : गोपाळ कृष्ण देवधर भारत सेवक समाजाचे एक संस्थापक सदस्य, 'सेवासदन' या संस्थेचे शिल्पकार, सहकारी चळवळीचे आद्य समर्थक (मृत्यू: १७ नोव्हेंबर १९३५)
१९०५ : भारतीय अभिनेते आणि निर्माते बिपीन गुप्ता यांचा जन्म. (मृत्यू: ९ सप्टेंबर १९८१)
१९०७ : भारतीय वकील आणि राजकारणी पी. जीवनवंश यांचा जन्म. (मृत्यू: १८ जानेवारी १९६५)
१९०९ : नागोराव घन:श्याम तथा 'ना. घ.' देशपांडे कवी (मृत्यू: १० मे २०००)
१९१० : नारायण श्रीधर बेन्द्रे आदिम कलेपासून चिनी चित्रकलेपर्यंत अनेक शैलीविशेष आत्मसात केलेले चित्रकार (मृत्यू: १८ फेब्रुवारी १९९२)
१९१५ : राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार सन्मानित प्रसिद्ध भारतीय उर्दू भाषिक कादंबरीकार, लघुकथा लेखक, आणि चित्रपट निर्माता इस्मत चुग़ताई यांचा जन्मदिन.
१९२२ : अमेरिकन खजिनदार शोधक आणि मेल फिशर मरीन हेरिटेज म्युझियमचे संस्थापक मेल फिशर यांचा जन्मदिन.
१९२४ : श्रीपाद अच्युत दाभोळकर 'प्रयोग परिवार' या संकल्पनेचे प्रवर्तक, गणितज्ञ आणि जमनालाल बजाज पुरस्काराने गौरवण्यात आलेले कृषीशास्त्रज्ञ (मृत्यू: ३०एप्रिल २००१)
१९२७ : भारतीय स्वातंत्र्यसेनानी, समाजवादी राजकारणी आणि उत्तरप्रदेश, उडीसा आणि पश्चिम बंगाल राज्याचे माजी राज्यपाल बी. सत्य नारायण रेड्डी यांचा जन्मदिन.
१९३४ : सुधाकरराव नाईक प्रसिद्ध भारतीय राजकारणी, भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे सदस्य तसचं, महाराष्ट्र राज्याचे माजी १३ वे मुख्यमंत्री (मृत्यू: १० मे २००१)
१९३९ : बोत्स्वानाचा राष्ट्राध्यक्ष फेस्टस मोगे यांचा जन्म.
१९६१ : व्ही. बी. चन्द्रशेखर भारताचा फिरकी गोलंदाज
१९७१ : प्रसिद्ध भारतीय राजकारणी आणि अरुणाचल प्रदेशचे विद्यमान मुख्यमंत्री पेमा खांडू यांचा जन्मदिन.
१९७३ : गूगल चे सहसंस्थापक सर्गेइ ब्रिन यांचा जन्म.
१९८१ : कनेक्ट्यू चे सहसंस्थापक कॅमेरॉन विंकल्वॉस यांचा जन्म.
१९८६ : उसेन बोल्ट जमैकाचा धावपटू. यांनी अनेक विश्व विक्रम आपल्या नावे केली आहेत.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१९३१ : 'गायनाचार्य' पं. विष्णू दिगंबर पलुसकर संगीतज्ञ, गायक, संगीतप्रसारक आणि गांधर्व महाविद्यालयाचे संस्थापक (जन्म: १८ ऑगस्ट १८७२)
१९४० : लिऑन ट्रॉट्स्की रशियन क्रांतिकारक (जन्म: ७ नोव्हेंबर १८७९)
१९४७ : बुगाटी कंपनी चे संस्थापक इटोर बुगाटी यांचे निधन. (जन्म: १५ सप्टेंबर १८८१)
१९७६ : पांडुरंग सातू नाईक आल्हाददायकता, कल्पकता व वास्तवता ही वैशिष्ट्ये असलेले चित्रपट छायालेखक
१९७७ : प्रेमलीला ठाकरसी एस. एन. डी. टी. विद्यापीठाच्या कुलगुरू
१९८१ : आचार्य दत्तात्रय बाळकृष्ण तथा 'काकासाहेब' कालेलकर गांधीवादी देशभक्त, शिक्षणतज्ञ, समाजसुधारक, इतिहासकार, बहुभाषा कोविद, रसिक, सखोल चिंतक, गुजराथ विद्यापीठाचे कुलगुरू (१९२८), राज्यसभा सदस्य (१९५२ १९५८), अनुसूचित जमातींच्या आयोगाचे अध्यक्ष (१९५३), गुजराथी साहित्यपरिषदेच्या अहमदाबाद अधिवेशनाचे अध्यक्ष (१९५९), हिन्दी विश्वकोश निर्मिती समितीचे सदस्य, साहित्य अकादमी पारितोषिक (१९६६) व फेलोशिप (१९७१) विजेते, पत्रकार व गुजराथी साहित्यिक(जन्म: १ डिसेंबर १८८५ सातारा, महाराष्ट्र)
१९९१ : गोपीनाथ मोहंती ज्ञानपीठ पारितोषिक विजेते ओरिया साहित्यिक (जन्म: २० एप्रिल १९१४)
१९९५ : सुब्रमण्यन चंद्रशेखर तार्यांचे आयुर्मान व त्यांचा शेवट यावरील संशोधनासाठी १९८३ मधे नोबेल पारितोषिक मिळालेले भारतीय-अमेरिकन खगोल वैज्ञानिक व गणिती. त्यांनी आपल्या आयुष्यातील बराच काळ कृष्णविवरांवरील संशोधनासाठी खर्च केला. यांचे काका सी. व्ही. रामन यांनाही भौतिकशास्त्रातील नोबेल पारितोषिक (१९३०) मिळाले आहे. भौतिकशास्त्रात नोबेल मिळवणारे हे दोघेच भारतीय वंशाचे आहेत. त्यांनी आपल्या आयुष्यातील बराच काळ कृष्णविवरांवरील संशोधनासाठी खर्च केला. जन्म: १९ आक्टोबर १९१०)
२००० : निर्मला गांधी समाजसेविका, महात्मा गांधींच्या स्नुषा (जन्म:)
२००० : विनायकराव कुलकर्णी स्वातंत्र्यलढ्यातील व गोवा मुक्तीसंग्रामातील प्रमुख सेनानी आणि समाजवादी विचारवंत (जन्म:)
२००१ : मराठी रंगभूमीचा वारकरी म्हणून गौरविले गेलेले शं. ना. तथा दादासाहेब अंधृटकर (जन्म:)
२००१ : शरद तळवलकर आपल्या सदासतेज अभिनयाने मराठी रसिकांच्या मनावर प्रदीर्घकाळ प्रसन्नतेचे अधिराज्य गाजवणारे विनोदी कलाकार (जन्म: १ नोव्हेंबर १९२१)
२००४ : भारतीय उडिया भाषा कवी सच्चिदानंद राऊत यांचे निधन. (जन्म: १३ मे १९१६)
२००६ : बिस्मिला खाँ भारत रत्न, पद्मश्री व पद्मविभूषण पुरस्कार सन्मानित प्रसिद्ध भारतीय शहनाई वादक (जन्म: १९१६)
२००७ : ज्ञानपीठ पुरस्कार सन्मानित प्रसिद्ध भारतीय उर्दू भाषिक लेखिका कुर्रतुलऐन हैदर यांचे निधन.

# उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते उत्कृष्ट कार्य करणाऱ्याचा सत्कार

बीड । प्रतिनिधी

भारताच्या ७९ व्या स्वातंत्र्य दिनानिमित्त उत्कृष्ट कार्य करणाऱ्या जिल्ह्यातील विविध विभागातील अधिकारी व कर्मचारी तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांचा गौरव उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री अजित पवार यांच्या हस्ते करण्यात आला.सामाजिक न्याय भवन परिसरात आयोजित कार्यक्रमात यावेळी आमदार सर्वश्री संदीप क्षीरसागर, विजयसिंह पंडित, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, जिल्हा पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहेमान यांच्यासह सर्व कार्यालय प्रमुख, अधिकारी यांची उपस्थिती होती.




जिल्ह्यातील उत्कृष्ट कार्य करणाऱ्या अधिकारी व कर्मचारी मध्ये पोलीस विभागातील पोलीस उपनिरिक्षक श्रीमती पल्लवी भाऊसाहेब जाधव, पोलीस हवालदार अशोक बापुराव शिंदे, पो.ह. प्रदिप निवृत्ती येवले, पोलीस उपनिरिक्षक श्रीराम रामदास खटावकर, पो.ह. शेख आसेफ शेख शमीम महसूल विभागातील निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, नायब तहसीलदार सचिन सुरेशराव देशपांडे, ग्राम महसूल अधिकारी सलीम शेख, संघर्षकुमार ओवे, सहायक महसुल अधिकारी जितेंद्र साहेबराव जाधव, राहुल रामनाथ बलाढ्ये, मंडळ अधिकारी श्रीमती शितल लक्ष्मणराव चाटे, परमेश्वर त्रिंबक काळे, सरपंच श्रीमती शेख मन्नाबी मुजफर पटेल क्रिडा विभागात क्रिकेटसाठी श्रावणी अजिनाथ तर दळवी, तायक्कांदोसाठी कु. नयन अविनाश बारगजे, व्हॉलीबॉलसाठी अफताब कुरेशी नौशाद, कबड्डीसाठी महारुद्र मधुकर गर्जे, खो-खोसाठी प्रताप शहादेव तुपे, योगा कु. सभाषिणी विनायकराव वझे, बेसबॉल/सॉफ्टबॉलसाठी आदित्य अरविंद विद्यागर तसेच यावेळी अवयव दान करणाऱ्या नातेवाईकांचे देखील यावेळी सत्कार करण्यात आले. यामध्ये श्रीमती कोटुळे कोमल गोकुळदास (पत्नी) व बाबुराव कोटुळे (वडील), अवयवदाता यांचे नातेवाईक प्रविण बालासाहेब निनाले (मुलगा), अवयवदाता यांचे नातेवाईक सुखदेव बाबुराव गायके (वडील), अधिसेविका श्रीमती गिरी रमा गोविंदराव, जिल्हा आरोग्य अधिकारी प्रातिनिधीक स्वरूपात डॉ. उल्हास गंडाळ, सुभेदार श्री. बलभिम किसन चिंचाणे, हवालदार श्री. अब्दुल वाजिद अब्दुल अजीज, कारागृह शिपाई श्री. रामआप्पा भागुजी परळकर, सहायक संशोधन अधिकारी महेश पुरूषोत्तम ठाकूर आदींचा यावेळी उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री अजित पवार यांच्या हस्ते प्रमाणपत्र देवून सन्मान करण्यात आला.

यावेळी भारताच्या ७९ व्या स्वातंत्र्य दिनानिमित्त सांस्कृतीक कार्यक्रम देखील पार पडला. तसेच कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अनिल शेळके, ज्ञानेश्वर कोटुळे, अथर्व शेळके यांनी केले. यावेळी लोकप्रतिनीधी, नागरिक, शालेय विद्यार्थी-विद्यार्थींनी, अधिकारी-कर्मचारी, पत्रकार यांची उपस्थिती होती.

## काळे झेंडे दडपले..पण शाळांचा प्रश्न दडपणार कसा?

### काळे झेंडे दाखवणार म्हणताच कार्यकर्ते पोलीस ठाण्यात स्थानबद्ध



बीड । प्रतिनिधी

जिल्हा परिषदेच्या तब्बल ९४ शाळांना इमारतच नाही आणि ३८१ शाळांमधील ६०७ वर्गखोल्या मोडकळीस आल्या आहेत. शिक्षक व विद्यार्थी जीव मुठीत धरून शिक्षण घेत असताना काही शाळांमध्ये छत कोसळून विद्यार्थी जखमी होण्याच्या घटना घडल्या आहेत. दोन वर्षांपूर्वी शिक्षण विभागाने १४ कोटी ८५ लाखांचा प्रस्ताव सादर केला तरी निधी मंजूर झाला नाही. मोडकळीस आलेल्या सरकारी शाळा ढासळल्या,छप्पर कोसळलं, शासन प्रशासनाला कधी जाग येणार? काळे झेंडे दडपले पण शाळांचा प्रश्न दडपणार कसा? असा संतप्त सवाल डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी केला आहे.

सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे यांनी वारंवार निवेदने व आंदोलन करूनही ठोस निर्णय न झाल्याने अखेर १५ ऑगस्ट रोजी पालकमंत्री अजित पवारांना काळे झेंडे दाखवण्याचा इशारा दिला.

यानंतरच पोलिस प्रशासनाने डॉ. ढवळे यांना नोटीस बजावत लिंबागणेश पोलीस चौकीत स्थानबद्ध केले. ‘‘स्वातंत्र्यदिनी लोकांच्या प्रश्नांसाठी सनदशीर मार्गाने आंदोलन करणे हा नागरिकांचा हक्क आहे. आंदोलने दडपण्याचा आणि आंदोलनकर्त्यांना पोलीस स्टेशनमध्ये थांबवण्याचा प्रयत्न हा निषेधार्ह आहे. जर पालकमंत्र्यांना काळे झेंडे दाखवणे अपमानास्पद वाटत असेल, तर त्यांनी तातडीने शाळांसाठी निधी द्यावा,‘‘ अशी भूमिका डॉ. ढवळे यांनी स्पष्ट केली.

# स्वातंत्र्य दिनी येवलवाडीकरांचे पाण्यासाठी आमरण उपोषण



पाटोदा । प्रतिनिधी

देशभरात स्वातंत्र्य दिनाचा जल्लोष असताना आष्टी मतदारसंघातील पाटोदा तालुक्यातील येवलवाडी गाव मात्र पाण्यासाठी आंदोलनाच्या मार्गावर उतरले आहे. येवलवाडी ग्रामपंचायत जल जीवन मिशन अंतर्गत सुरू असलेल्या पाणी पुरवठा योजनेत प्रचंड मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार, निकृष्ट दर्जाचे साहित्य आणि कामातील विलंब यामुळे ग्रामस्थांचा संयम सुटला. त्यामुळे आज शुक्रवार, दि. १५ ऑगस्ट २०२५ रोजी जलजीवन कामाची भ्रष्टाचाराची चौकशी करावी म्हणून संत भगवानबाबा व वामनभाऊ मंदिरा समोर बेमुदत आमरण उपोषणास करण्यात आले.

येवलवाडी जल जीवन मिशन अंतर्गत गावकऱ्यांना शुद्ध पिण्याचे पाणी मिळावे यासाठी योजना हाती घेण्यात आली होती मात्र प्रत्यक्षात पाईप लाईन योजनेत निकृष्ट दर्जाच्या नळ्या वापरण्यात आल्या तसेच येवलवाडी जल जीवन कामात अंदाज पत्रकातील बोर व आडवा बोर अद्याप न झाल्याची खंत,पाईपलाईन रस्त्या ऐवजी शेत जमिनीं मधून घालण्याचा प्रयत्न ज्यामुळे शेतकऱ्यांचा विरोध.यामुळे अंदाज पत्रकात नमूद दोन विहिरींची दुरुस्ती महिन्यांपासून प्रलंबित आहे तसेच ग्रामस्थांनी प्रशासना समोर स्पष्ट मागण्या ठेवल्या आहेत योजना वेळेत व गुणवत्तेसह पूर्ण करावी. पाणी मोटर चालूबंद करण्यासाठी अंदाजपत्रकानुसार सोयीस्कर जागा निश्चित करावी. विहिरी पासून टाकीपर्यंतची पाईपलाईन फक्त रस्त्यानेच टाकावी. केवळ दर्जेदार कंपनीच्या नळ्यांचा वापर व्हावा; तसेच निकृष्ट साहित्य टाकणाऱ्यांवर गुन्हा दाखल करावा. अंदाज पत्रकाप्रमाणे बोर व आडवा बोर घ्यावा. दोन विहिरींची दुरुस्ती तातडीने करावी. कामाचे बिल केवळ गुणवत्तेची तपासणी करूनच अदा करावी व पुढील सर्व काम अंदाजपत्रप्रशासनाच्या प्रशासनाची ावी ह्या मागणीसाठी येवलडीकर मागणी करत असुन आम्ही शासनाकडे पाणी मागतोय ते उपकार म्हणून नव्हे, तर आमचा हक्क आहे आमच्या मागण्या मान्य झाल्याशिवाय उपोषण संपणार नाही. पाणी मिळालेच पाहिजे; जीव गेला तरी लढा थांबणार नाही ह्या मागणीसाठी येवलवाडी येथील महिला, युवक आणि ज्येष्ठ नागरिक सर्वच उपोषणात सहभागी झाले आहे गावात तणावाचे वातावरण असुन येवलवाडी ग्रामस्थांनी योजनेतील उणीवांसाठी भ्रष्ट कंत्राटदार, निष्क्रिय अभियंते आणि ढिम्म प्रशासन यांना जबाबदार धरले असुन वारंवार तक्रारी करूनही कोणतीही सुधारणा न झाल्याने हा टोकाचा पवित्रा घेतल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. प्रशासनाने त्वरित दखल न घेतल्यास लवकरच जिल्हा,तालुका कार्यालयावर मोर्चा, रस्तारोको आणि जलसमाधी आंदोलन छेडण्याचा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे.स्वातंत्र्य दिनी पाण्यासारख्या मूलभूत हक्कासाठी गावकऱ्यांना उपोषण करावे लागणे ही आष्टी पाटोदा शिरूर मतदार संघातील प्रशासनाची अपयशाची कबुली ठरत आहे

# जालन्यात पोलिस प्रशिक्षण कक्ष, अत्याधुनिक सीसीटिव्ही यंत्रणा व वाहतूक सिग्नलचे लोकार्पण

जालना । प्रतिनिधी

स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधत, जालना जिल्ह्यातील कायदा आणि सुव्यवस्था अधिक सक्षम करण्याच्या दृष्टीने महत्वाकांक्षी सीसीटिव्ही यंत्रणेचे आज राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री तथा जिल्हयाच्या पालकमंत्री पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते लोकार्पण करण्यात आले.या अत्याधुनिक सीसीटिव्ही यंत्रणा व वाहतूक सिग्नल यंत्रणेमुळे जिल्ह्यातील कायदा-सुव्यवस्थेला नवी दिशा व पोलिस दलाच्या कार्यक्षमतेत वाढ होईल असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

जिल्हा नियोजन विकास समितीच्या ( डीपीडीसी) माध्यमातून पाच कोटी रूपये खर्चून मंजूर करण्यात आलेल्या अत्याधुनिक सीसीटिव्ही यंत्रणा, पोलीस प्रशिक्षण कक्ष व सीएसआर फंडातून ग्रेडर टी पॉईंट येथे वाहतूक सिग्नल यंत्रणेचे लोकार्पण ना. पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते आज करण्यात आले, त्यावेळी त्या बोलत होत्या. जिल्ह्यातील गुन्हेगारीवर नियंत्रण ठेवण्यासाठी पोलिसांना आधुनिक तंत्रज्ञानाची मोलाची साथ मिळणार आहे.नव्याने उभारण्यात आलेल्या प्रशिक्षण सभागृहामुळे पोलिस दलाच्या कार्यक्षमतेत वाढ होणार असून, वाहतूक सिग्नलमुळे शहरातील वाहतुकीस अधिक शिस्तबद्ध आणि सुरळीत चालना मिळणार आहे. कार्यक्रमास भाजपाचे जिल्हाध्यक्ष आ. नारायण कुचे, आ. अर्जुन खोतकर, आ. हिकमत उढाण, आ. राजेश राठोड, भाजपा ग्रामीण जिल्हाध्यक्ष भास्कर दानवे, जिल्हाधिकारी आशिमा मित्तल, पोलिस अधीक्षक अजयकुमार बन्सल, जिल्हा परिषद सीईओ मिन्नू पी. एम., महानगरपालिका आयुक्त खांडेकर यांच्यासह प्रशासकीय अधिकारी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.




या उपक्रमामुळे जालना शहरातील कायदा-सुव्यवस्थेला नवी दिशा मिळणार असुन, पोलिस दलाच्या कार्यक्षमतेत लक्षणीय वाढ होण्याची अपेक्षा पालकमंत्री पंकजाताई मुंडे यांनी यावेळी व्यक्त केली.

अत्याधुनिक सीसीटिव्ही यंत्रणेमुळे जिल्ह्यातील गुन्हेगारीवर नियंत्रण ठेवण्यासाठी पोलिसांना आधुनिक तंत्रज्ञानाची मोलाची साथ मिळणार आहे.तसेच नव्याने उभारण्यात आलेल्या प्रशिक्षण सभागृहामुळे पोलिस दलाच्या कार्यक्षमतेत वाढ होईल असा विश्वास पंकजाताई मुंडे यांनी व्यक्त केला. पोलिसांच्या कार्यक्रमांवर ना. पंकजाताई मुंडे यांनी शहरातील प्रमुख स्टील इंडस्ट्रीजच्या उद्योजकांसोबत चर्चा केली. जालना फस्ट अंतर्गत शहरातील स्वच्छता, कचरा व्यवस्थापन व अन्य उपक्रम राबविण्यात येणार आहेत, याचं सादरीकरण बैठकीत करण्यात आलं. या उपक्रमाचे कौतुक करून पंकजाताई मुंडे यांनी शहराला क्रमांक एक वर आणण्यासाठी माझे नेहमीच सहकार्य राहील असं सांगितलं.

# के.एस.पी विद्यालय येथे स्वातंत्र दिन उत्साहात साजरा



बीड । प्रतिनिधी

शहरातील (कर्मयोगिनी सावित्रीबाई फुले विद्यालय) के.एस.पी विद्यालय येथे ७९ वा स्वातंत्र दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर, छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा गांधी, कर्मयोगीनी सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पुजन करण्यात आले. नंतर ध्वजारोहण करण्यात आले. विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर,धार्मिक, गीतांवर नृत्य, नाटिका, भाषण सादर केले. सर्व उपस्थित पालकांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले. सत्यम विघ्ने इयत्ता ३री याने मंथन परीक्षेत यश संपादन केले. त्याबद्दल शाळेतर्फे त्याचा सत्कार करण्यात आला. सत्यम विघ्ने इयत्ता ३री याने मंथन परीक्षेत यश संपादन केले. त्याबद्दल शाळेतर्फे त्याचा सत्कार करण्यात आला. चि.सत्यम विघ्ने, इयत्ता ३ री या विद्यार्थ्यांने मंथन परीक्षेत यश संपादन केले. त्याबद्दल शाळेतर्फे त्याचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमास अध्यक्ष म्हणून सौ.अंजलीताई शेळके , प्रमुख उपस्थिती ऋषिकेशजी शेळके जेष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी तथा समग्र शिक्षा विभाग प्रमुख तसेच तसेच शाळेतील प्र.मुख्याध्यापक, विशाल सुपेकर व शाळेतील शिक्षक शिक्षिकेत्तर कर्मचारी उपस्थितीत होते.

# पाटोदा शाळेत स्वातंत्र्य दिन

मंठा । प्रतिनिधी

देशाच्या स्वातंत्र्याचा ७९ वा वर्धापन दिन पाटोदा येथील पीएमश्री जिल्हा परिषद प्रशालेत व प्राथमिक शाळेत १५ ऑगस्ट रोजी अत्यंत उत्साहात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी प्रशालेचे प्रभारी मुख्याध्यापक एन.डी.पारसकर यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. प्रास्ताविक मुख्याध्यापक एस.डी. तोटेवाड यांनी केले. विद्यार्थ्यांनी देशभक्तिप्रेरित मराठी इंग्रजी व हिंदी भाषेत भाषणे सादर केली. या कार्यक्रमात श्रेया स्पर्धा परीक्षा उत्तीर्ण होऊन राज्य गुणवत्ता यादीत स्थान मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा प्रमाणपत्र व मेडल देऊन सन्मान करण्यात आला. प्रतिष्ठित नागरिक आसारामजी बोराडे, प्रशालेच्या समितीचे अध्यक्ष तुळशीराम घुटे,



रामेश्वर काळे (स्वातंत्र्यसैनिक पाल्य), तसेच शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य गुणाजी नजान, जीवन वायाळ, दत्ता मोरे, सुरेश काळे, पालक कैलासराव बोराडे, सुदाम डोळझाके, भागवत डोळझाके, गणेश गोरे, परमेश्वर काळे, इंजि. प्रल्हाद नजान आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.याप्रसंगी आसारामजी बोराडे, रामेश्वरजी काळे, दत्ता मोरे, इंजि. प्रल्हाद नजान प्रेरणादायी विचार मांडले. डी.एस.मिसाळ यांनी अध्यक्षीय समारोप केला. कार्यक्रमाच्या शेवटी प्राथमिक शिक्षक गंगाधर वानोळे यांनी उपस्थितांचे आभार मानले. कार्यक्रमास शाळेतील सर्व शिक्षक, पालक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जिव्हाळा केंद्र मानवतेचा खरा चेहरा-डॉ.संजय तांदळे

बीड । प्रतिनिधी

शहरातील नवीन भाजी मंडई भागात दै. पार्श्वभूमी च्या बाजूला जिव्हाळा बेघर केंद्र असून, गेली १८ वर्षापासून या केंद्रामध्ये निराधार बेघर यांना हक्काचा निवारा देऊन त्यांचे प्रतिकूल परिस्थितीतही संगोपन करून जिव्हाळा देण्याचे काम केंद्राचे संचालक अभिजीत वैद्य व्यवस्थापक राजू वंजारे , स्नेहभोजन सह सर्वांची काळजी घेणाऱ्या छायाताई सरोदे या तिघांनी मिळून आपल्या जीवनाचा प्रत्येक श्वास समाज सेवेला अर्पण केला आहे .आत्तापर्यंत जवळपास एक हजार बेघर, निराधार यांना रोजगार भिमुख छोटे छोटे व्यवसायाचे संबंधित प्रशिक्षकांकडून प्रशिक्षण देऊन रोजगार उपलब्ध करून देऊन पुनर्वसन केलेले आहे. काहींना सेवेतील रोजगार उपलब्ध करून दिलेला आहे.अनेकांना मदतीचा हात देऊन संसार उभे केलेले आहेत. काहींना त्यांच्या कुटुंबा कडे किंवा नातेवाईक कडे पुनर्वसन केलेले आहे.



आतापर्यंत ३३ निराधारांचा अंत्यविधी जिव्हाळा परिवाराने केलेला आहे. सध्या जिव्हाळा केंद्रामध्ये ६० पेक्षा जास्त निराधार वयोवृध्द असून त्यांची काळजी घेत संगोपन केले जात आहे.अनाथांना घरदार हरवलेल्या जीवांना त्यांनी आईच्या मायेने वडिलांच्या आधाराने आणि मित्रांच्या जिव्हाळ्याने कवटाळलं आहे. जिव्हाळा बेघर केंद्राचे संचालक अभिजीत वैद्य, व्यवस्थापक राजू वंजारे, काळजीवाहक व्यवस्थापक छायाताई सरोदे या तिघांचा योगायोगाने जुलै ,ऑगस्ट या दोन महिन्यांमध्ये मला असून.नुकताच तिघांचा वाढदिवस मातृभूमी प्रतिष्ठान परिवाराच्या वतीने त्यांना शाल पुष्पगुच्छ व सन्मानपत्र देऊन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी जिव्हाळा केंद्राच्या वतीने रक्षाबंधना निमित्त जीव्हाळा केंद्राच्या काळजीवाहक व्यवस्थापिका छायाताई सरोदे, भारती ईरापल्ले, मुक्त पत्रकार ज्योत्स्नांताई चव्हाण सह जिव्हाळा केंद्रातील महिला, माता भगिनींनी सर्वांना राखी बांधून रक्षाबंधन साजरे करण्यात आले. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डी.जी. तांदळे म्हणाले की, आजच्या स्वार्थी जगात स्वतःच्या सोयीसाठी माणसं बदलत चालली आहेत. जिव्हाळा टीमचे कार्य संत गाडगेबाबांच्या दशसूत्री संदेशाप्रमाणे चालू आहे. भुकेलेल्यांना अन्न, तहानलेल्यांना पाणी, उघड्या नागड्यांना वस्त्र, गरीब मुला-मुलींना शिक्षणासाठी मदत, बेघरांना आसरा ,औषध उपचार, आदी प्रमाणे जिव्हाळा टीमचे कार्य चालू असून,मानव सेवा हीच ईश्वर सेवा मनात बेघर रंजल्या गांजलेल्याची सेवा करत आहेत .त्यांच्या पाठीशी आपण सर्वजण खंबीरपणे उभा राहून त्यांना मदतीचा हात दिला पाहिजे असे मत डी.जी.तांदळे सरांनी यावेळी व्यक्त केले मान्यवरांनी देखील आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी प्राचार्य डी. जी. तांदळे, डॉ. संजय तांदळे ,लक्ष्मण चाटे ,डॉ. लक्ष्मण पवळ , प्रा. बाळासाहेब नागरगोजे, सुदाम कोळेकर, श्याम मार्कंडे,पोलीस उपनिरीक्षक विजय जाधवर, वासुदेव मिसाळ, सेवानिवृत्त पोलीस उपनिरीक्षक बाबासाहेब जायभाये, शिवाजी भारती ,सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक शिवाजी चौधरी, जिल्हा परिषद चे सेवानिवृत्त अभियंता सुभाष चाटे,पत्रकार भागवत वैद्य, साहस आदोडे, शिवप्रसाद शिरसाट, आत्माराम वाव्हळ, संजय कुलकर्णी, ज्योत्स्ना चव्हाण, शेख ईब्राेज, बाजीराव ढाकणे,रामधन जमाले, अशोक येडे तसेच विविध पक्षातील पदाधिकारी कार्यकर्ते, पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते, मित्र परिवार आदींनी जीव्हाळा केंद्राचे अभिजीत वैद्य राजू वंजारे व छायाताई सरोदे यांना वाढदिवसानिमित्त दीर्घायुष्य लाभो व निस्वार्थ समाजसेवेचा मानवतेचा दीप उजळत राहो अशा शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डी.जी. तांदळे, प्रमुख पाहुणे एड.अनिल बारगजे, एड. नितीन वाघमारे, कार्यक्रमाचे प्रस्ताविक अभिजीत वैद्य यांनी केले, सूत्रसंचालन डॉ. संजय तांदळे व छायाताई सरोदे तर आभार राजू वंजारे यांनी मानले.

# गजानन विद्यालयात स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा



राजूरी । प्रतिनिधी

येथील गजानन माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात स्वातंत्र्य दिनानिमित्त अमृत स्वामी महाराज, हेमंत क्षीरसागर यांच्या प्रमुख उपस्थितीत आणि प्राचार्य प्रशांत पवळ यांच्या अध्यक्षतेखाली ध्वजारोहन संपन्न झाले.

स्वातंत्र्य दिनानिमित्त प्रथम राष्ट्रपिता महात्मा गांधी, डॉ.बाबासाहेब आंबेडकर व विद्येची देवता सरस्वती यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. त्यानंतर बीड नगरपालिकेचे उपाध्यक्ष हेमंत क्षीरसागर यांनी स्वातंत्र्य दिनानिमित्त ग्रामिण भागातील मुलांनी नवनवीन शैक्षणिक सुविधांचा फायदा घेणे गरजेचे आहे असे सांगितले तर अमृत स्वामी महाराज यांनी स्वातंत्र्य दिनानिमित्त सर्वांना शुभेच्छा दिल्या. अध्यक्षीय भाषणामध्ये प्राचार्य प्रशांत पवळ यांनी विद्यालयाच्या माध्यमातून इ.५ ते १२ वी पर्यंतच्या सर्व विद्यार्थ्यांना भौतिक व शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देवून त्याचा निश्चितपणे विद्यार्थ्यांना फायदा झाला आहे असे सांगून स्वातंत्र्य दिनानिमित्त सर्वांना शुभेच्छा दिल्या. त्यानंतर शाळेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव करण्यात आला. यावेळी उपमुख्याध्यापक शिंदे एस. एस., पर्यवेक्षक दगडे व्ही. एन., सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी, गावातील प्रतिष्ठीत नागरीकांची उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन जयदिप सरवदे यांनी केले. शेवटी नितीन शिंदे यांनी उपस्थितांचे आभार मानले. विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करून कार्यक्रमाची सांगता झाली.

राज्य लोकतंत्र
रविवार, दि.१७ ऑगस्ट २०२५ | ६

# प्रशासनाने नियम घालून दिलेल्या नियमाचे पालन करून गणेशोत्सव व ईद-ए-मिलाद साजरी करा -पो.नि.शरद भुतेकर

आष्टी । प्रतिनिधी

अवघ्या काही दिवसावर येऊन ठेपलेल्या गणेश उत्सव व ईद-ए-मिलाद या दोन्ही धर्मीयांच्या पवित्र सना निमित्त अनुषंगाने आष्टी पोलीस स्टेशनच्या आवारात शनिवारी सकाळी ९ .३५ ला शांतता शांतता शांतता समितीची बैठक संपन्न झाली यावेळी आष्टी तालुका पोलीस निरीक्षक शरद भुतेकर उपस्थितांना संबोधित करताना बोलत होते यावेळी एपीआय सूर्यवंशी फौजदार शिंदे तसेच आष्टी शहरातील व्यापारी गणेश मंडळाचे कार्यकर्ते व दोन्ही समाज बांधव उपस्थित होते यावेळी भुतेकर पुढे बोलताना म्हणाले की उद्या होऊ घातलेल्या गणेश उत्सव हा सर्वांनी शासनाने घालून दिलेल्या नियमाचे काटेकोरपणे पालन करून साजरा करावा तसेच गतवर्षी डीजे वाद्याला संपूर्णपणे प्रशासनाने बंदी घातल्याने पारंपरिक वाद्याचा मिरवणुकीमध्ये वापर करावा तसेच आष्टी शहरांमध्ये गणेश उत्सवाला मोठी परंपरा आहे शहरांमध्ये बरेच काही मानाचे मंडळे आहेत या मंडळाबरोबर इतर युवक देखील गणेशाची स्थापना करतात मात्र गणेश उत्सवा दरम्यान गणेशाच्या स्थापनेपासून ते विसर्जन मिरवणुकीपर्यंत प्रशासनाने काही नियम घालून दिले आहेत त्यामध्ये आपल्या गणेश स्थापनेच्या ठिकाणची जागा स्वच्छ असली पाहिजे तसेच गणेश मंडळाचा गणेश स्थापनेचा मंडप शासनाने दिलेल्या नियमाप्रमाणेच पाहिजे त्याचबरोबर नित्यनेमित गणेशाची आरती झाली पाहिजे त्याचबरोबर रात्री अपरात्री या ठिकाणी काही अनुचित प्रकार होऊ नये म्हणून आम्ही देखील





खबरदारी घेत आहोत आमच्या डिपारमेंट मधील एक कर्मचारी आम्ही प्रत्येक मंडळासाठी देणार आहोत गणेश स्थापना करण्यासाठी धर्मादाय आयुक्त ची परवानगी तसेच ऑनलाइन फॉर्म भरणे देखील बंधनकारक आहे याचबरोबर मुस्लिम धर्मियांचा ईद-ए-मिलाद देखील याच दरम्यान आल्याने आम्ही या ईद-ए-मिलाच्या मिरवणुकीला गणेश उत्सवानंतर ही मिरवणूक घेण्याची परवानगी देणार आहोत व ते आम्ही प्रशासनाची खबरदारी म्हणून पार पाडणार आहोत तसेच आष्टी शहरांमध्ये आम्ही काही ठिकाणी कॅमेरे बसवणार आहोत कॅमेरे बसवण्यासाठी आम्हाला काही लोकांनी विरोध केला आहे अशा लोकांवर देखील आम्ही बॉम्बे च ॲक्ट नुसार करावाई करणार आहोत तसेच आष्टी शहरांमध्ये मुस्लिम धर्मीय व हिंदू बांधव या दोन्ही समाज बांधवांनी एकत्रित येऊन दोन्ही उत्सव साजरी करावे व एकतेचा संदेश दीला पाहीजे आष्टी शहरांमध्ये गेल्या काही दिवसापासून घरफोड्या चोरांचे प्रमाण वाढले आहे याची खबरदारी म्हणून जनतेने आपल्या घरासाठी सेफ्टी डोअर व सायरन लॉक चे वापर करावा जेणेकरून चोरीला थोडाफार आळा बसेल नगरपंचायत च्या माध्यमातून प्रत्येक मेन चौकामध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात आले आहे या कॅमेऱ्याच्या माध्यमातून आमची संपूर्ण शहरावर नजर आहे पोलीस स्टेशन मधून या कॅमेऱ्यामध्ये जागेवरून संदेश देण्याची टेक्नॉलॉजी चे काम देखील सुरू असून ती थोड्या दिवसात कार्यविनित होईल गणेश विसर्जनाच्या मिरवणुकीमध्ये कर्ण कर्कश डीजेवर प्रशासनाने यावर्षी पूर्णपणे बंदी घातल्याने आपण विसर्जन मिरवणुकीमध्ये ढोल लेझीम बँड अशा पारंपारिक वाद्याचा वापर करावा तसेच गणेश विसर्जन मिरवणुकीमध्ये कोणीही दारू पिऊन धिंगाणा घालू नये नसता त्याला कायदेशीर कारवाई होईल आम्ही करू तसेच बीड जिल्हा पोलीस निरीक्षक कावत सरांनी अमली पदार्थ घेणाऱ्यांच्या विरोधात मोठी मोहीम राबवली असून याचे देखील आपण काटेकोर पालन करावे अमली पदार्थांमध्ये आपल्या भागामध्ये लपून छापून गांजा विकला जातो हा गांजा जर कोणी विकत असेल तर लगेच पोलीस प्रशासनाची भ्रमणध्वनी ◀◀ पान २ वर



**परळी : शहरामध्ये मुख्य भागात मेन रोडवरील रूपम रेडीमेड व हेमा गिफ्ट सेंटर जवळ मोठा खड्डा आहे त्यामध्ये गाड्या, माणसं पडुन अपघात होत आहेत.त्यामुळे त्वरित बुजवणे आवश्यक आहे. तसेच गंगासागर नगर,कृष्णानगर मधील सरस्वती नदी वरील छोटापूलाला आडकलेला कचरा त्वरीत काढा व नगर पालिकेतील आपतकालीन पथक सज्ज ठेवावे अशी मागणी माजी नगराध्यक्ष दीपक नाना देशमुख यांनी केली**

## स्वत:ची तुलना स्वत:शी करा – वैष्णवी बजाज सिंदफणा शाळेत स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा

माजलगाव । प्रतिनिधी

''स्वत:ची तुलना स्वत:शी करा. इतरांशी स्पर्धा न करता आपल्या क्षमतेवर विश्वास ठेवा आणि दररोज स्वत:च्या सुधारणेसाठी प्रयत्न करा,'' असे प्रेरणादायी आवाहन शाळेच्या माजी विद्यार्थिनी वैष्णवी बजाज यांनी सिंदफणा पब्लिक स्कूलमध्ये आयोजित स्वातंत्र्य दिन समारंभात केले.

सविस्तर वृत्त असे की, दरवर्षीप्रमाणे याही वर्षी सिंदफणा



पब्लिक स्कूलने माजी विद्यार्थ्यांच्या हस्ते ध्वजारोहणाची परंपरा कायम ठेवली. शाळेची माजी विद्यार्थिनी आणि सध्या पुणे येथे सनदी लेखापाल म्हणून कार्यरत असलेल्या वैष्णवी बजाज यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक आणि मुख्य पाहुण्यांचा परिचय शाळेचे उपप्राचार्य राहुल कदम यांनी करून दिला.या देशभक्तीपर समारंभात शाळेच्या इयत्ता चौथीच्या प्रतिभावान विद्यार्थ्यांनी भारतीय संस्कृतीचे अप्रतिम प्रतिबिंब दाखवणारे नाटक सादर केले. त्याबरोबरच हृदयस्पर्शी देशभक्तीगीते आणि नृत्य सादरीकरणांनी उपस्थित प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले. अर्णव काळे, जागृती शिंदे, रुद्र कदम, गीतांजली जाधव, शौर्य देशमुख आणि रिया बजाज या विद्यार्थ्यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ◀◀ पान २ वर

## कृष्ण मंदिरात जन्माष्टमी साजरी

पाटोदा । प्रतिनिधी

शहरातील महानुभव कृष्ण मंदिरात व रस्तागल्ली येथील कृष्ण मंदिरात गोकुळाष्टमी मोठ्या उत्साहात साजरी झाली . शुक्रवारी सकाळी महानुभव पंथाचे कृष्ण मंदिरात अंजली जोशी, वैष्णवी डहाळे यांनी राजा वसुदेव यांनी कृष्ण जन्मोत्सव क्षणाची भव्य रांगोळी आरंस काढली तसेच फुलांची सजावट,लाईटींग करण्यात आली होती.दिवसभर विविध कार्यक्रमांची रेलचेल होती.कृष्ण मंदिरात पूजाअर्चा सायंकाळीची आरती करत रात्री कृष्ण जन्मोत्सव साजरा करण्यात आला.

## आनंद शैक्षणिक संकुलात स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा

### डॉ.अजय धोंडे यांच्या हस्ते ध्वजारोहण संपन्न

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी येथील आनंद शैक्षणिक संकुलातील कृषी महाविद्यालयात ७९ वा. स्वातंत्र्यदिन राष्ट्रभक्तिपूर्वक आणि उत्साहात साजरा करण्यात आला.आनंद चॅरिटेबल संस्थेचे संस्थापक अध्यक्ष माजी आ.भीमराव धोंडे यांच्या प्रमुख उपस्थितीत झाला.संस्थेचे सहसचिव डॉ. अजयदादा धोंडे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. कार्यक्रमास प्रा.राजेंद्र धोंडे, अभयराजे धोंडे,ज्येष्ठ पत्रकार उत्तम बोडखे,प्रशासन अधिकारी डॉ.डी.बी.राऊत,प्रा. शिवदास विधाते,संजय शेंडे, प्रा.सागर



वाघुले,संदीप ननवरे, शिवाजी थोरवे,सुभाष वाघ, आनंद शैक्षणिक संकुलातील सर्व महाविद्यालयांचे प्राचार्य, प्राध्यापक,शिक्षकेतर कर्मचारी, पोलीस कॉन्स्टेबल रमेश गिरी व विद्यार्थी उपस्थित होते.स्वातंत्र्य दिनानिमित्त विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या देशभक्तिपर व शेताकरी गीतांनी उपस्थितांची मने जिंकली.१२ गीतांची सादरीकरणे करण्यात आली. कृषी महाविद्यालयाच्या शेतकरी गीतासाठी उपस्थितांनी भरभरून असा प्रतिसाद दिला. कार्यक्रमाचे अध्यक्ष भीमराव धोंडे यांनी शेतकरी गीतामध्ये सहभागी असणाऱ्या विद्यार्थ्यांना १० हजार रु बक्षीस दिले.संस्थेच्यावतीने स्पर्धक विद्यार्थ्यांना रोख रक्कम स्वरूपात बक्षिसे देण्यात आली. बक्षीस वितरण स्वरूप,प्रथम क्रमांक: ५००१ रु, द्वितीय क्रमांक: ३००१ रु,तृतीय क्रमांक: २००१ रु डिप्लोमा विभाग -प्रथम क्रमांक

डी. फार्मसी महाविद्यालय, द्वितीय क्रमांक: नर्सिंग महाविद्यालय , तृतीय

## आष्टी शहरात स्टंटबाजी करणाऱ्या युवकांचे प्रमाण वाढले

### रिल्सच्या नादात चार चाकी चे जीव घेणे प्रयोग

**आष्टी । प्रतिनिधी**

आष्टी शहरातील मार्केट यार्ड परिसरामध्ये आमदार सुरेश आण्णा धस यांच्या माध्यमातून नगर विकास मधुन नगरपंचायतने मोठमोठी सिमेंट रस्ते केले आहेत. या रस्त्या चा गैरवापर करण्याचे काम हे हुल्लड बाजी करणारे तरुण करत आहेत.याच रस्त्यावर १५ ऑगस्ट रोजी सायंकाळी ६ वाजल्याच्या दरम्यान दोन तरुणांनी स्विफ्ट कंपनीची चार चाकी गाडी या रस्त्यावर एवढ्या मोठ्या वेगाने धावून रिल्स करण्याच्या नादात या गाडीच्या भरधाव स्पीडमुळे गाडी कंट्रोल न झाल्याने या गाडीने तीन पलट्या मारल्या व तिचे



तोंड विरुद्ध दिशेला गेले अशा या जीवघेण्या स्टंटबाजी करणाऱ्या युवकांना कुठलीही इजा झाली नाही तरी देखील असे जीवघेणे स्टंट करणाऱ्या वर कुठेतरी कायदेशीर कारवाई झाली पाहिजे तरच याला आळा बसेल व नगरपंचायतने या सिमेंट रस्त्यावर स्पीड ब्रेकर करणे गरजेचे आहे अशी या भागातील नागरिक करत आहेत या स्टंटबाजीचा आखो देखी या रस्त्यालगत असलेले जगताप क्लासेस चे महादेव जगताप सरांनी हा संपूर्ण या युवकांचा स्टंट मी माझ्या डोळ्यांनी पाहिला फारच जीवघेणा हा प्रसंग होता मात्र वाढ वडिलांच्या पुण्याईमुळे यांना कुठलीही इजा झाली नाही तरी देखील अशा तरुणांवर कारवाई झाली तरच अशा स्टंटबाजा बंद होतील असे देखील जगताप सर म्हणाले. या रस्त्यावर शहरातील ◀◀ पान २ वर

## शहरातील सर्व सीसीटिव्ही कॅमेऱ्याचे फुटेज एसपी कार्यालयात दिसणार

जालना । प्रतिनिधी

महाराष्ट्र शासनाने जिल्हा नियोजन समिती निधीतून ४ कोटी ९० लाख रुपये निधीतून जालना शहरातील ४८ ठिकाणी १९० सीसीटिव्ही कॅमेरे तसेच पोलिस अधिक्षक कार्यालय येथील पोलिस प्रशिक्षण कक्ष व ग्रेडर टी पॉईंट येथे वाहतूक सिग्नल कामांचा लोकार्पण सोहळा पालकमंत्री श्रीमती पंकजा मुंडे यांच्या हस्ते पोलिस अधिक्षक कार्यालयात पार पडला. सीएसआर फंडातुन ग्रेडर



टी पॉईंट येथे वाहतूक सिग्नल बसविण्यात आले आहेत.

यावेळी आमदार अर्जुन खोतकर, आमदार नारायण कुचे, आमदार हिकमत उढाण, आमदार राजेश राठोड, जिल्हाधिकारी आशिमा मित्तल, जि.प.मुख्य ◀◀ पान २ वर



## व्हीएमडी नर्सिंग महाविद्यालयात स्वातंत्र्य दिनानिमित्त ध्वजारोहण

परळी । प्रतिनिधी

व्हीएमडी म्हणजेच वैजनाथराव मुकुंदराव देशमुख नर्सिंग महाविद्यालय, परळी प्रांगणात ७९ व्या स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून तिरंगा ध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रपिता महात्मा गांधी व भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून पूजन व अभिवादनाने झाली. त्यानंतर संस्थेचे संचालक प्रकाश देशमुख यांनी तिरंगा ध्वजाचे ध्वजारोहण केले. कार्यक्रमानंतर सामूहिक राष्ट्रगीत व महाराष्ट्र गीत ◀◀ पान २ वर

## प्रथमेश ॲक्युपंक्चर ट्रेनिंग अँड रिसर्च सेंटरचा सि.ए.ई. कार्यक्रम

**माजलगाव । प्रतिनिधी**

विजया प्रतिष्ठान द्वारा संचालित प्रथमेश ॲक्युपंक्चर ट्रेनिंग अँड रिसर्च सेंटरचा सि.ए.ई. कार्यक्रम संभाजीनगर मध्ये दि १० ऑगस्ट रोजी यशस्वीरित्या संपन्न झाला

प्रथमेश ॲक्युपंक्चर ट्रेनिंग अँड रिसर्च सेंटरचा सि.ए.ई. कार्यक्रम दि १० ऑगस्ट रविवार रोजी छत्रपती संभाजी नगर येथील हॉटेल मोदी सम्राट,सेंट्रल बस स्थानकासमोर आयोजित करण्यात आला होता.महाराष्ट्र कौन्सिल ऑफ ॲक्युपंक्चर मुंबई मान्यता प्राप्त विजया प्रतिष्ठान माजलगाव सि.ए.ई.सेंटरचा पहिला कार्यक्रम संभाजीनगर मध्ये संपन्न झाला.कार्यक्रमाचे उद्घाटन डॉ.मयांक शाहा यांच्या हस्ते झाले.या कार्यक्रमात डॉ.मयांक शाहा,बी.एस.पटेकर, केदार फरतडे,दिपक पन्हाळे,राजु बोबडे यांच्यासह डॉ.रुबी बेहराम व नारायण नवले,यांनी ऑनलाईन मार्गदर्शन केले.तर कार्यक्रमचे संयोजक डॉक्टर संतोष गायकवाड यांनी योग्य प्रकारे नियोजन केले होते.



## माजी मुख्याध्यापकांनी भारतीय स्वातंत्र्य दिन इंग्लंडमध्ये साजरा केला

तलवाडा । प्रतिनिधी

इंग्लंड येथे स्थायिक असणाऱ्या हिंमत नाटकर या आपल्या मुलाला भेटायला गेलेल्या माजी मुख्याध्यापकाचे भारतीय प्रेम, १५ ऑगस्ट स्वातंत्र्य दिन भारतामध्ये झेंडावंदन साजरा करण्यासाठी उपस्थित नसल्याने थेट इंग्लंड येथे माजी मुख्यध्यापक गणपतराव नाटकर यांनी झेंडावंदन करून भारतीय एकात्मतेचा संदेश देत इंग्लंडमध्ये भारत माता की जय घोषणा दिल्या प्रा.गणपतराव नाटकर यांच्या या भारतीय प्रेमाबद्दल भारतातून शुभेच्छाचे वर्षाव करण्यात येत आहे. गणपत नाटकर मूळ गेवराई तालुक्यातील तलवाडा या गावचे भूमी पुत्र आहेत त्यांचा मुलगा हिमत नाटकर इंग्लड येथे स्थायिक असल्याने भेटायला आलेले माजी मुख्याध्यापक गणपतराव नाटकर, यांनी १५ ऑगस्ट दिन साजरा इंग्लंड येथे केला आहे त्यांच्या या राष्ट्र प्रेमाला सर्वांनी शुभेच्छा दिल्या असून माजी आमदार अमरसिंह पंडित, आमदार विजयसिंह राजे पंडित, जयसिंह पंडित यांच्या सह तलवाडा करांनी अभिनंदन करुन कौतुक केले आहे.



## श्री विठोबा मंदिरात श्रीकृष्ण जन्माष्टमीचा सोहळा उत्साहात साजरा

**आष्टी । प्रतिनिधी**

**आष्टी शहरातील श्री विठोबा मंदिर, दत्तनगर, मुर्शदपुर येथे कृष्ण जन्माष्टमीचा धार्मिक सोहळा उत्साहात पार पाडण्यात आला. मंदिरात भगवान श्रीकृष्णाच्या जन्माचा आनंद साजरा करण्यासाठी भाविकांनी भजन-कीर्तन आणि विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन केले होते.**

जन्माष्टमीच्या दुसऱ्या दिवशी (नंद महोत्सव) महाप्रसाद वितरणाचे कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. यावेळी मंदिरातील भाविकांनी गोपाळकाल्याच्या प्रसादाचा लाभ घेतला, तसेच दुसऱ्या दिवशी



महाप्रसाद सामूहिक भोजनाचेही आयोजन करण्यात आले होते

या कार्यक्रमात आष्टी व मुर्शदपूर गावातील अनेक भाविक, तसेच मंदिराच्या अध्यक्षा सौ. प्राजक्ता सुरेश धस विश्वस्त भारती यादव, शुभम रत्नपारखी, सुनिता रत्नपारखी, कुलकर्णी परिवार तसेच श्री पांडू देवा शास्त्री सौताडा तसेच जन्माष्टमीच्या रात्री सौताडा भजनी मंडळ व चौभा निमगाव भजनी मंडळ व स्थानिक नागरिकांनी मोठ्या प्रमाणात सहभाग घेतला. मंदिर प्रांगणात भक्तिभावाने श्रीकृष्णाच्या जीवनावर आधारित प्रसंग सादर करण्यात आले.मंदिर संस्थानाचां अध्यक्षा प्राजक्ता ताई धस यांनी भाविकांना धन्यवाद देत म्हटले, ''श्रीकृष्णभक्तीत एकत्र येणाऱ्या सर्वांनी या उत्सवाला चैतन्यमय केले. आपल्या सहकार्यामुळेच असे कार्यक्रम यशस्वी होतात.'' या उत्सवाच्या निमित्ताने गावात धार्मिक एकात्मता व भक्तिमय आनंदाचे वातावरण निर्माण झाले होते. या कार्यक्रमासाठी श्री मनोज रत्नपारखी,दीपक उंबरकर, साधू हंबर्डे, भूषण शेंडे, बंडू शिंदे, धीरज देशपांडे व सर्व श्रीकृष्णभक्त परिवार यांनी परिश्रम घेतले

## नूर उर्दू प्राथमिक शाळेमध्ये ध्वजारोहण उत्साहात संपन्न

**बीड । प्रतिनिधी**

जय हिंद कॅम्पस बीड अल रशीद शिक्षण सास्कृतिक व समाज सुधार संस्था बीड संचलित नूर उर्दू प्राथमिक शाळा बीड येथे स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने ध्वजारोहणाचे कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता सदरील कार्यक्रमांमध्ये ध्वजारोहण शेख जहीर भाई तालुकाध्यक्ष भारतीय राष्ट्रीय काँग्रेस निरीक्षक व निराधार विभाग बीड च्या शुभ हस्ते करण्यात आले यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून सदरील भागातील जमात अमीर शेख मुकद्दर भाई महाराष्ट्र कामगार संघटनेचे जिल्हाध्यक्ष शेख नसीर भाई ,फैस खान शेख, कलीम शेख ,अफसर शेख रसूल, सय्यद इलियास ,सदर आधी मान्यवर उपस्थित होते पडत्या पावसामध्ये अत्यंत जल्लोषामध्ये विद्यार्थ्यांनी ध्वजारोहणाप्रसंगी राष्ट्रगीत म्हंटले शालेय विद्यार्थ्यांनी विविध देशभक्तीपर गीते यावेळी सादर केली संस्थेचे सचिव शेख निजाम, मो.अजहर, शेख अमर यांनी आलेल्या सर्व मान्यवरांसह शाळेचे कौतुक केले यावेळी सदरील भागातील प्रतिष्ठित नागरिक पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शिक्षकांनी परिश्रम घेतले

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा...नवे विचार...

पुणे विशेष

रविवार, दि.१७ ऑगस्ट २०२५ । पान ७

# खडसेंच्या जावयाचा पाय खोलात; महिलेचे विवस्त्र अवस्थेतील फोटो काढल्याप्रकरणी गुन्हा

पुणे । प्रतिनिधी

**खराडी पार्टी प्रकरणात राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार) नेते एकनाथ खडसे यांचे जावई डॉ. प्रांजल खेवलकर यांच्याविरुद्ध सायबर पोलीस ठाण्यात शुक्रवारी गुन्हा दाखल करण्यात आला. एका महिलेचे विवस्त्र अवस्थेतील फोटो काढल्याप्रकरणात तिने दिलेल्या तक्रारीवरून हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सायबर पोलिसांनी या प्रकरणी भारतीय न्याय संहिता ७७, तसेच माहिती-तंत्रज्ञान कायदा २००० कलम ६६ (ई ) अन्वये डॉ. खेवलकर यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला.**



खराडीतील एका हॉटेलमध्ये २५ जुलै रोजी झालेल्या पार्टीवर गुन्हे शाखेने छापा टाकला. या प्रकरणी डॉ. प्रांजल मनीष खेवलकर, निखिल जेठानंद पोपटाणी, समीर फकीर महमंद सय्यद, सचिन सोमाजी भोंबे, श्रीपाद मोहन यादव, इशा देवज्योत सिंग, प्राची गोपाल शर्मा यांना अटक करण्यात आली. यावेळी एका महीला आरोपीकडून २ ग्रॅम ७० मिलीग्रॅम कोकेन, ७० ग्रॅम गांजा सदृश पदार्थ, हुक्का पात्र, दहा मोबाइल, सुगंधी तंबाखू, दोन मोटारी, मद्याच्या बाटल्या असा मुद्देमाल जप्त करण्यात आला होता.

डॉ. खेवलकर यांच्याविरुद्ध एका संस्थेने राज्य महिला आयोगाकडे तक्रार दिली. डॉ. खेवलकर यांनी खराडीतील हॉटेलमध्ये यापूर्वी पार्टी आयोजित केली होती. या पार्टीत तरुणींना बोलाविण्यात आले होते. त्यामुळे या प्रकरणाची सखोल चौकशी करण्यात यावी, अशी मागणी संबंधित संस्थेने केली होती. त्यानुसार राज्य महिला आयेगाने या प्रकरणाची सखोल चौकशी करण्याचे आदेश पुणे पोलिसांना नुकतेच दिले. याबाबत महिला आयोगाकडून पोलीस आयुक्त अमितेशकुमार यांना पत्र देण्यात आले आहे.

या प्रकरणात पोलिसांनी डॉ. खेवलकर यांचा दुसरा मोबाइल , कॅमेरा, लॅपटॉप जप्त केला आहे, तसेच संबधित हॉटेलमधील सीसीटीव्ही चित्रीकरण तपासले असून, चित्रीकरण साठविणारे यंत्र (डीव्हीआर) ताब्यात घेतला आहे. उर्वरित सहा आरोपींचे मोबाइल आणि पेन ड्राईव्ह जप्त करण्यात आले आहे. त्याअनुषंगाने पोलिसांकडून तांत्रिक तपास करण्यात येत आहे. या प्रकरणात एक महिलेने सायबर पोलीस ठाण्यात नुकतीच फिर्याद दिली आहे. २०२२ ते जून २०२५ या कालावधीत डॉ. खेवलकर यांनी वेगवेगळ्या हॉटेलमध्ये बोलावून त्यांचे निर्वस्त्र अवस्थेतील छायाचित्रे काढली. महिलेची संमती नसताना ही छायाचित्रे काढण्यात आली. या छायाचित्रांचा गैरवापर केला जाण्याची शक्यता आहे, अशी फिर्याद महिलेने नुकतीच सायबर पोलीस ठाण्यात दिली.


# ज्येष्ठ अभिनेत्री ज्योती चांदेकर यांचे पुण्यात निधन

## तेजस्विनी पंडितसह कुटुंबियांवर दु:खाचा डोंगर

पुणे । प्रतिनिधी

**मराठी चित्रपटसृष्टीतील ज्येष्ठ अभिनेत्री ज्योती चांदेकर यांचे शनिवारी पुण्यात निधन झाले. त्या ६८ वर्षांच्या होत्या. त्यांच्या पश्चात दोन मुली आहेत. त्यातील अभिनेत्री तेजस्विनी पंडित ही मराठी कलाविश्वातील प्रसिद्ध अभिनेत्री आहे. गेल्या तीन-चार दिवसांपासून खासगी रुग्णालयात त्यांच्यावर उपचार सुरु होते. त्यादरम्यान त्यांची दुपारी चार वाजता प्राणज्योत मालविली. चांदेकर यांच्या पार्थिवावर रविवारी सकाळी ११ वाजता वैकुंठ स्मशानभूमी येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. चांदेकर यांच्या निधनाने मराठी चित्रपटसृष्टीत शोक व्यक्त होत आहे.**





चांदेकर यांच्या गुडघ्यावर २०१९ मध्ये शस्त्रक्रिया करण्यात आली होती. त्यातून बाहेर पडल्यावर त्यांनी पुन्हा मालिकांमध्ये काम करायला सुरुवात केली होती. त्यांनी रंगभूमीवर आपल्या अभिनयाची छाप सोडली होती. 'रखेली' हे त्यांचे गाजलेले नाटक होते. त्यासोबतच त्यांनी 'मादी', 'जंगली कबुतर', 'राजकारण गेले चुलीत', 'मिसेस आमदार सौभाग्यवती' अशा विविध नाटकांमधून भूमिका केल्या. तर, 'गुरू', 'ढोलकी', 'तिचा उंबरठा', 'दमलेल्या बाबाची कहाणी', 'पाऊलवाट', 'मी सिंधूताई सपकाळ', 'सलाम', 'सांजपर्व' अशा सिनेमांमधून त्यांनी केलेल्या भूमिका गाजल्या होत्या. 'तू सौभाग्यवती हो', 'छत्रीवाली' या मालिकांमध्ये महत्त्वपूर्ण भूमिका केल्या होत्या. अभिनय क्षेत्रात त्यांनी केलेल्या कार्याचा गौरव म्हणून पुणे नाटय़परिषदेतर्फे त्यांना 'जीवनगौरव' देण्यात आला होता. तसेच 'मी सिंधूताई सपकाळ' या चित्रपटासाठी त्यांना 'झी गौरव' पुरस्कार प्रदान करण्यात आला होता.

# निगडीत चेंबरमध्ये गुदमरून तीन कामगारांचा मृत्यू

पिंपरी : स्वातंत्र्यदिनाच्या सकाळी देशभरात तिरंगा फडकवून देशभक्तीची गाणी सुरू असतानाच निगडी प्राधिकरण परिसरात तीन कंत्राटी कामगारांचा मृत्यू झाला. त्यांच्या कुटुंबांवर दु:खाचा डोंगर कोसळला आहे. बीएसएनएलच्या इन्स्पेक्शन चेंबरमध्ये ऑप्टिकल फायबरचे काम करताना गुदमरून तीन कंत्राटी कामगारांचा मृत्यू झाला. ही हृदयद्रावक घटना दुपारी निगडी प्राधिकरण सेक्टर क्रमांक २७, प्लॉट क्रमांक ६५ समोर रस्त्याच्या कडेला असलेल्या बीएसएनएलच्या चेंबरमध्ये घडली.

दत्ता होलारे, लखन धावरे (दोघेही रा. गुरुद्वारा चौक, आकुर्डी) आणि साहेबराव गिरसेप (रा. बिजलीनगर) अशी मृत कामगारांची नावे आहेत. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, बीएसएनएल आकुर्डी कार्यालयातील तीन कंत्राटी कामगार नेहमीप्रमाणे रोजच्या कामावर गेले होते. मात्र, चेंबरमध्ये उतरल्यावर हवाबंद जागेत गुदमरल्याने ते बाहेर येऊ शकले नाहीत.


घटनेनंतर परिसरात क्षणात खळबळ उडाली. स्थानिकांनी कामगारांना बाहेर काढण्यासाठी जीव तोडून प्रयत्न केले, मात्र तोपर्यंत उशीर झाला होता. दरम्यान, घराबाहेर कामाला गेलेली आपली माणसे आता परत येतील या आशेने वाट पाहणाऱ्या कुटुंबियांना, दुपारपर्यंत त्यांच्या निधनाची दु:खद बातमी कळवण्यात आली. कुणाच्या कपाळावरचे कुंकू पुसले, कुणाच्या डोक्यावरची सावली हिरावली, तर कुणाच्या हातातील कष्टकऱ्याची ऊब कायमची हरपली. स्वातंत्र्यदिनाच्या दिवशी तिन्ही घरांचे दिवे विझल्याने हळहळ व्यक्त होत आहे

# अण्णा, आता तरी उठा, मतांची चोरी झालीय; पुण्यात अण्णा हजारेंच्या फोटोसह झळकले बॅनर

पुणे । प्रतिनिधी

ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे (-पपर क्षक्षरीश) यांनी दिल्लीतील जंतरमंतरवर केलेलं आंदोलन जगभरात गाजलं होतं. मै हूँ अण्णा.. या भ्रष्टाचारविरोधी आंदोलनाची दखल जगभरातील अनेक माध्यमांनी घेतली होती. तर, भारतात सत्तांतर करण्यासही हे आंदोलन कारणीभूत ठरल्याचं बोललं जातं. मात्र, लोकायुक्त आणि लोकपाल यासाठी केलेल्या अण्णा आंदोलानंतर अण्णा हजारेंनी पुन्हा तितकं मोठं आंदोलन केल्याचं कुठंही पाहण्यात आलं नाही. विशेष म्हणजे २०१४ च्या अगोदर झालेल्या या आंदोलनचा मोठा फटका काँग्रेसला बसला. त्यानंतर, देशात आणि महाराष्ट्रातही भाजपचे सरकार सत्तेवर आले. मात्र, त्यानंतर अण्णांचं आंदोलन कुठेही झालं नाही. त्यामुळे, अनेकदा सोशल मीडियातून अण्णांना ट्रोलही केलं जातं. आता, पुन्हा एकदा पुण्यातून अण्णांना प्रश्न विचारण्यात आले आहेत.

पुण्यातील पाषाण भागात ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते अण्णा हजारे यांना बॅनरच्या माध्यमातून





पुणेरी टोले लगावण्यात आले आहेत. अण्णा आता तरी उठा... असे म्हणत पुण्यात अण्णा हजारे यांना आवाहन करणारे बॅनर्स झळकले असून या बॅनर्सची राजकीय वर्तुळात चर्चा सुरू आहे. अण्णा हजारे यांनी सध्याच्या सरकारविरुद्ध भूमिका घेत आंदोलन करावे, किंवा सरकारला सवाल करावे असाच आशय या बॅनर्समधून दिसून येतो. अण्णा आतातरी उठा...कुंभकर्णसुद्धा गाढ झोपेतून रावणासाठी आणि लंकेसाठी उठला होता. तुम्ही आपल्या देशासाठी आतातरी उठा, असे म्हणत अण्णांना आवाहन करण्यात आलंय.देशात मतांची चोरी होत असताना, देशात भ्रष्टाचार फोफावला असताना, देशात हुकूमशाही माजलेली असताना, देशाची लोकशाही धोक्यात असताना. अण्णा तुमच्या सारखा जेष्ठ गांधीवादी समाजसेवक शांत कसा? अण्णा, दिल्लीच्या जंतर-मंतर मैदानावर पुन्हा तुमची जादू पाहण्यासाठी देश आतुर आहे. अशा आशयाचे बॅनर पुण्याच्या पाषाण परिसरात लावण्यात आले आहेत. पाषाण भागातील सामाजिक कार्यकर्ते समीर उत्तरकर यांनी हे बॅनर्स आपल्या नावासह लावले असून सध्याच्या राजकीय परिस्थितीवर, मतचोरीवर अण्णांनी बोलावे, आंदोलन करावे, अशी मागणी या बॅनरमधून करण्यात आलीय.

# हरवलेले ४१ मोबाईल तक्रारदारांच्या ताब्यात; शिवाजीनगर पोलिसांचे यश

पुणे । प्रतिनिधी

भारताच्या ७९ व्या स्वातंत्र्य दिनाच्या पार्श्वभूमीवर शिवाजीनगर पोलिस ठाण्याच्या सायबर पथकाने तब्बल ५ लाख रुपये किंमतीचे हरवलेले ४१ मोबाईल फोन शोधून तक्रारदारांना परत केले. या कारवाईबद्दल तक्रारदारांनी पोलिसांप्रती कृतज्ञता व्यक्त केली.

शिवाजीनगर पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक महेश बोळकोटगी यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि संतोष पाटील, पोलीस अंमलदार तेजस चोपडे व आदेश चलवादी यांनी ही कारवाई केली. हरवलेल्या मोबाईलचा डेटा तयार करून तांत्रिक तपास करण्यात आला. तपासादरम्यान हे मोबाईल महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांत तसेच इतर राज्यांत वापरले जात असल्याचे आढळून आले. स्थानिक पोलिस ठाण्यांच्या मदतीने सर्व मोबाईल हस्तगत करण्यात आले.

हस्तगत करण्यात आलेले मोबाईल परिमंडळ १ चे पोलिस उपआयुक्त कृषीकेश रावले व सहायक पोलिस आयुक्त साईनाथ ठोंबरे यांच्या हस्ते तक्रारदारांना परत करण्यात आले. मोबाईल परत मिळाल्याने तक्रारदारांच्या चेहऱ्यावर आनंद झळकला

# भक्ती शक्ती येथे देशभक्तीचा जल्लोष!!

## पिंपरी चिंचवड महापालिकेच्या 'झेंडा उंचा रहे हमारा' कार्यक्रमाला नागरिकांचा प्रतिसाद...

पिंपरी । प्रतिनिधी

आकाशामध्ये डौलाने फडकणारा तिरंगा आणि दुसरीकडे 'ऐ वतन, वतन मेरे आज़ाद रहे तू', 'दिल दिया है, जान भी देंगे ये वतन तेरे लिये', 'आय लव्ह माय इंडिया', 'जय जय महाराष्ट्र माझा', 'वंदे मातरम्' यांसारख्या हृदयाला भिडणाऱ्या देशभक्तिपर गाण्यांचे सादरीकरण... असा देशप्रेम, शौर्य आणि ऐक्याचा अद्वितीय संगम पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने स्वातंत्र्य दिनानिमित्त निगडी येथील भक्ती शक्ती येथे आयोजित केलेल्या 'झेंडा उंचा रहे हमारा' या कार्यक्रमात पाहायला मिळाला.





भारताच्या स्वातंत्र्यदिनाचा ७८ वा वर्धापन दिन पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्त महापालिकेच्या पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय इमारतीच्या प्रांगणात ध्वजारोहण आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांच्या हस्ते करण्यात आले. त्यानंतर महापालिकेच्या वतीने निगडी येथील भक्ती शक्ती चौकात आयोजित देशभक्तिपर गीतांच्या कार्यक्रमाला सुरुवात झाली. या कार्यक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. महापालिकेचे उपायुक्त अण्णा बोदडे यांनी याप्रसंगी उपस्थित नागरिकांना मार्गदर्शन करताना भारतीय स्वातंत्र्य संग्रामाचा इतिहास आणि त्यातून मिळालेल्या स्वातंत्र्याचे महत्त्व सांगितले. तसेच पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने 'घरोघरी तिरंगा - घरोघरी स्वच्छता' या मोहिमेअंतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती दिली

देशभक्तिपर गीतांच्या कार्यक्रम अनुभवण्यासाठी महापालिकेचे मुख्य उद्यान अधिक्षक महेश गारगोटे,मुख्य सुरक्षा अधिकारी उदय जरांडे,मुख्य आपत्ती व्यवस्थापन अधिकारी ओमप्रकाश बहिवाल,विशेष अधिकारी किरण गायकवाड,कार्यकारी अभियंता संतोष दुर्गे,जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांच्यासह शहरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. देशभक्तिपर गीतांच्या सादरीकरणासोबतच 'भारत माता की जय', 'वंदे मातरम्', 'हम सब एक हैं' अशा घोषणांचा आवाज येथे दुमदुमत होता. उत्साह, अभिमान आणि राष्ट्रभक्तीची भावना प्रत्येकाच्या मनात जागवणारे असे वातावरण येथे होते.या कार्यक्रमात 'ए वतन, वतन मेरे आज़ाद रहे तू', 'दिल दिया है जान भी देंगे', 'तेरी मिट्टी में मिल जावां', 'एक तू ही भरोसा', 'देश रंगीला', 'जय जय महाराष्ट्र माझा', 'कर हर मैदान फतेह', 'संदेसे आते हैं', 'मेरा रंग दे बसंती चोला', 'वंदे मातरम' यांसारखी अनेक लोकप्रिय गाणी हिंदी व मराठी भाषेतील देशभक्तीपर गीते एकत्र येऊन देशप्रेमाचे सुंदर वातावरण तयार झाले होते.

या कार्यक्रमाचे नियोजन महापालिकेचे सहशहर अभियंता मनोज सेठीया यांनी केले होते. तर गायक सतीश इंगळे,अमित दीक्षित, दीपक माने, आशिष देशमुख, किरण अंदुरे, पृथ्वीराज अंदुरे, गायिका मनीषा निश्चल दृष्टी बालानी, प्रीती बिजवे यांनी देशभक्तीची गाणी सादर करून उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. स्वराज मुझिक स्वराज म्युझिक बँडच्या ९ प्रतिभावान वादकांनी त्यांना उत्तम साथ दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महापालिकेचे उपअभियंता किरण अंधुरे यांनी केले.

# २२ किलो सोन्याचा कलशारोहण सोहळा आळंदी येथे संपन्न

आळंदी । प्रतिनिधी

आज आळंदी येथे श्री संत ज्ञानेश्वर महाराजांच्या ७५० व्या शतकोत्तर संजीवनी समाधी जयंती निमित्ताने मंदिरावरती २२ किलो सोन्याचे सुवर्ण कलशारोहण सोहळा संपन्न झाला.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते सुवर्ण कलशारोहणचे पूजन

पुणे शहरातील तीर्थक्षेत्र आळंदी येथे ज्यांनी सांप्रदायाचा पाया रचला ते संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराज यांच्या सप्तशतकोत्तर सुवर्ण दिनाच्या पावनपरवावर माऊलींच्या संजीवन समाधी मंदिरावर सुवर्णकलशारोहण समारंभ संपन्न झाला. यावेळी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या हस्ते सुवर्ण कलशारोहनाचे पूजन करण्यात आले.

महाद्वार जीर्णोद्धार कार्यारंभाचे पूजन उपमुख्यमंत्री श्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. ज्ञानेश्वरी सार्थ ऑडिओ बुक प्रकाशन शुभहस्ते माननीय मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांच्या शुभहस्ते संपन्न झाला. यावेळी शहरातील प्रमुख मान्यवर उपस्थित होते.या सुवर्ण महोत्सवी सोहळ्याला ज्ञानेश्वर माऊली देवस्थानच्या विश्वस्तांच्या आदेशानुसार काही मोजक्याच मान्यवरांच्या उपस्थितीत हा सोहळा संपन्न झाला.

# पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने स्वातंत्र्य दिन विविध उपक्रमांद्वारे उत्साहात साजरा

पिंपरी । प्रतिनिधी

भारताच्या स्वातंत्र्य दिनाचा ७८ वा वर्धापन दिन पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्त महापालिकेच्या पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय इमारतीच्या प्रांगणात ध्वजारोहण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले, यावेळी उपस्थितांना आयुक्त शेखर सिंह यांनी शुभेच्छा दिल्या.

आयुक्त सिंह म्हणाले,'भारतीय स्वातंत्र्याला ७८ वर्षे पूर्ण झाली. स्वातंत्र्याचा उत्सव आपण घरोघरी तिरंगा हा उपक्रम राबवून आनंदाने साजरा करत आहोत. देशाच्या स्वातंत्र्यलढ्यात योगदान देणाऱ्या सर्व महान व्यक्तींच्या त्यागाचे स्मरण करण्याचा आजचा दिवस आहे. आपल्या देशाच्या इतिहासाची सुवर्ण पाने आपल्याला सतत प्रेरणा देत राहतील. सर्वप्रथम मी सर्व शहरवासियांना भारतीय स्वातंत्र्य दिनानिमित्त खूप खूप शुभेच्छा देतो.''शहराच्या सर्वांगीण विकासासाठी पिंपरी चिंचवड महापालिका कटिबद्ध आहे. स्वच्छता, आरोग्य, पायाभूत सुविधा, ई-प्रशासन आणि सांस्कृतिक क्षेत्रातील यशस्वी उपक्रमांमुळे आपले शहर देशभरात वेगळा ठसा उमटवत आहे. आगामी काळात देशाच्या जडणघडणीत आणि सर्वांगीण विकासामध्ये आपल्या शहराचे मोठे योगदान असेल, असा मला दृढ विश्वास आहे,' असेही आयुक्त शेखर सिंह म्हणाले.

या राष्ट्रध्वजारोहण कार्यक्रमास आमदार उमा खापरे, ,माजी महापौर योगेश बहल, माजी उपमहापौर राजू मिसाळ, माजी नगरसदस्य गोविंद पानसरे,नामदेव ढाके, जितेंद्र ननावरे,अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, तृप्ती सांडभोर,शहर अभियंता मकरंद निकम,मुख्य लेखापरीक्षक प्रमोद भोसले,सह आयुक्त मनोज लोणकर,आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ.लक्ष्मण गोफणे, डॉ.अभयचंद्र दादेवार, यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ.राजेंद्र वाबळे, सह शहर अभियंता बापूसाहेब गायकवाड,देवन्ना गट्टूवार,अनिल भालसाखळे,उप आयुक्त राजेश आगळे,अण्णा बोदडे, पंकज पाटील, प्रदीप ठेंगल,ममता शिंदे,मुख्य सुरक्षा अधिकारी उदय जरांडे,मुख्य आपत्ती व्यवस्थापन अधिकारी ओमप्रकाश बहिवाल,अग्निशमन अधिकारी ऋषिकेश चिपाडे, विशेष अधिकारी किरण गायकवाड, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांच्यासह विविध विभागातील अधिकारी,आपदा मित्र प्रमुख संतोष शेलार आणि ३० आपदा सहकारी,विविध विभागांचे प्रमुख,सामाजिक कार्यकर्ते,कर्मचारी आणि शहरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दिवंगत स्वातंत्र्य सैनिक यांच्या वीरपत्नी यांचा गौरव..

आजच्या कार्यक्रमात आयुक्त शेखर सिंह यांचे हस्ते शहरातील स्वातंत्र्य सैनिकांच्या वीरपत्नी,वीरनारींचा सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.त्यामध्ये दिवंगत स्वातंत्र्य सैनिक श्रीकृष्ण मेहेंदळे यांच्या वीरपत्नी सुलोचना मेहेंदळे,दिवंगत दिगंबर ढवळे यांच्या वीरपत्नी भिमाबाई ढवळे,दिवंगत बाळकृष्ण पुराणिक यांचा मुलगा प्रफुल्ल पुराणिक यांचा समावेश होता.

विविध शौर्यपदक विजेते मनपा अधिकारी,कर्मचारी यांचाही गौरव....

यंदा स्वातंत्र्यदिनानिमित्त देशसेवा करणाऱ्या पिंपरी चिंचवड परिसरातील आजी-माजी सैनिकांना देश सेवेबद्दल स्मृतिचिन्ह देऊन गौरविण्यात आले.यामध्ये नायक सुभेदार मनोजकुमार साहू, नायक सुबेदार झेंडे रायबा आणि नायक अमितकुमार सिंह, सुबेदार मेजर संदीप बहिवाल, ऑननरी कॅप्टन प्रमोद निकम, मेजर उदय जरांडे यांचा समावेश होता.ऑपरेशन स्नो लेपर्ड (लेह-लडाख) मध्ये उल्लेखनीय कामगिरी केल्या बद्दल कमेंडेशन कार्ड पदक प्राप्त नायब सुबेदार मनोजकुमार साहू, नायब सुभेदार झेंडे रायबा आणि नायब अमितकुमार सिंह यांना सन्मानित करण्यात आले.तर सुभेदार मेजर संदीप बहिवाल यांना ऑपरेशन कारगिल मध्ये कमेंडेशन कार्ड मिळाल्याबद्दल सन्मानित करण्यात आले. ऑननरी कॅप्टन प्रमोद निकम यांनी ऑपरेशन कारगिल मध्ये केलेल्या कामगिरीबद्दल कमेंडेशन कार्ड प्राप्त केले तर मेजर उदय जरांडे यांनी बार टू सेना मेडल (शौर्य पदक) २००५, सेना मेडल (शौर्य पदक) २००६, मेंशन इन डिस्पॅचेस (शौर्य पदक) २००५ आणि कमेंडेशन कार्ड २००६ असे अनेक सन्मान मिळवले आहेत. त्यांनी ऑपरेशन ऑर्किड (मणिपूर) मध्ये उल्लेखनीय सेवा बजावली. या सर्व शूरवीरांचा पिंपरी चिंचवड स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.

युध्दामध्ये शहीद झालेल्या सैनिकांच्या वीरपत्नींचा सत्कार..

१९९७ मध्ये झालेल्या ऑपरेशन राहिनो मध्ये शहीद झालेले सुभेदार जालिंदर पाटील यांच्या वीरपत्नी सुमन पाटील तर दिवंगत हवालदार राजेंद्र जगदाळे यांच्या वीरपत्नी ज्योती जगदाळे यांचाही आयुक्त शेखर सिंह यांचे हस्ते सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.

अवयवदान करणा-यांच्या कुटुंबियांचा गौरव...

आज देशभरात विविध कारणांनी शरीरातील अवयव गमवलेल्यांची संख्या मोठी आहे. मृत्यू नंतरही देहाचा उपयोग व्हावा, महाराष्ट्रातील अवयव दानाचे प्रमाण वाढावे व अवयव दानाच्या प्रतीक्षेतील रुग्णांना नवजीवन मिळावे यासाठी राज्याच्या सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत अवयव दान जीवन संजीवनी अभियान राबविण्यात येत आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिका देखील यासाठी शहरात सातत्याने जनजागृती करत आहे. या उपक्रमांतर्गत पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने अवयव दान करून नवजीवन देणाऱ्या कुटुंबांचा सन्मान स्वातंत्र्यदिनानिमित्त सन्मान केला यामध्ये दिवंगत विनोद मुथा यांच्या पत्नी स्वाती विनोद मुथा, दिवंगत मंगेश आगळे यांच्या पत्नी वर्षा मंगेश आगळे, दिवंगत प्रसाद गोसावी यांचे नातेवाईक अविनाश गोसावी, दिवंगत बिना क्षीरसागर यांचे नातेवाईक प्रकाश पंढरीनाथ क्षीरसागर, दिवंगत सुनीता साळवी यांचे नातेवाईक मन्मय साळवी आणि दिवंगत सागर हदगल यांचे नातेवाईक सोमनाथ परशुराम हदगल या अवयव दात्यांच्या कुटुंबांचा गौरव करण्यात आला. महापालिकेने नागरिकांना अवयव दानाबाबत सकारात्मक दृष्टीकोन ठेवण्याचे व या सामाजिक कार्यात सक्रिय सहभाग नोंदविण्याचे आवाहन केले.